# आस्वाद

मराठी विभाग
तृतीय वर्ष कला शाखा
रामनिरंजन झुनझुनवाला
स्वायत्त महाविद्यालय,
घाटकोपर (प.), मुंबई-८६.


















# प्रास्ताविक..

जागतिक मराठी भाषादिन आणि कविवर्य कुसुमाग्रज जन्मदिन हे औचित्य साधून, तृतीय वर्ष कला शाखेच्या मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेले " आस्वाद" हे इ-पुस्तक सर्वांसाठी विभागाच्या वेबसाईटवर उपलब्ध  करून देताना मराठी विभागाला विशेष आनंद होत आहे.

कोवीड १९च्या पार्श्वभूमीवर  २०२०-२१ हे शैक्षणिक वर्षं ऑनलाईन पद्धतीनेच सुरू राहिले. त्यामुळे दरवर्षाप्रमाणे भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने तृतीय वर्ष कला शाखेच्या विद्यार्थ्यांचा भित्तिपत्रक लेखनाचा उपक्रमही  व्हॉट्सअप माध्यमातून घेतला. या वर्षी ग्रंथालयात जाऊन इतर पुस्तकांविषयी लिहिणे हे  शक्य नसल्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यासलेल्याच साहित्यकृतींचा " आस्वाद" सादर करावा, असा निर्णय घेतला. विद्यार्थ्यांनी घेतलेला साहित्यकृतींचा आस्वाद हे स्वरूप असल्यामुळे, या लेखन मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही, याची कृपया नोंद  घ्यावी.

प्रगती निकम या विद्यार्थिनीने या इ पुस्तकाचे मुखपृष्ठ साकारले आहे. प्लेसमेंट ऑफिसर श्री. देवीप्रसाद शेट्टी यांनी इ पुस्तकासंदर्भातील तांत्रिक बाबी सांभाळल्या,यासाठी मराठी विभागातर्फे कृतज्ञता व्यक्त करते.

"आस्वाद" हे "इ-पुस्तक" आज, २७ फेब्रुवारी २०२१ रोजी सर्वांसाठी खुले करत आहोत.

डॉ. स्नेहा देऊस्कर

मराठी विभाग प्रमुख.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | विद्यार्थ्यांचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | माझ्या मित्राची गोष्ट | ऋतुजा बेंद्रे | १ |
| २. | तिच्या मुलीचा बाप | प्रगती निकम | ३ |
| ३. | शाळा कादंबरी | ऋतुजा बेंद्रे | ६ |
| ४. | मासा आणि आक्रमकता | रवींद्र मांजरेकर | ८ |
| ५. | निर्णय | अनुष्का देशमुख | १० |
| ६. | गुंता | सागर जाधव | १३ |
| ७. | एकाकी सूर्य वितळताना | ओंकार फंड | १६ |
| ८. | शाळा कादंबरी | अनुष्का अनंत देशमुख | १९ |
| ९. | किरवंत नाटक | ऋतुजा बेंद्रे | २१ |
| १०. | झलक सिझर कर म्हणतेय माती | सेजल थोरवडे | २३ |
| ११. | रत्नप्रभा जाधव वर्तमानपत्रातील बातमी होते तेव्हा | वृषाली भोर | २६ |
| १२. | बाप -सिझर कर म्हणतेय माती | दिव्या  करगुटकर | ३१ |
| १३. | मित्राची गोष्ट | उमेरा शेख | ३३ |
| १४. | बेईमान इडा पिडा टळो | ओंकार फंड | ३७ |
| १५. | जाता नाही जात नाटक | ऋतुजा बेंद्रे | ४० |
| १६. | प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप | सेजल थोरवडे | ४५ |
| १७. | प्रिय | धनराज साळवी | ४७ |

# ओल हरवलेली माती - कथासंग्रह

## माझ्या मित्राची गोष्ट

नीरजा लिखित ओल हरवलेली माती

या कथासंग्रहतील माझ्या मित्राची गोष्ट या कथेबद्दल -

कथेच्या सुरुवातीलाच कथेतील विली हे पात्र कथा सांगताना सांगतो की -

ही गोष्ट माझी नाही. कदाचित ही गोष्ट माझ्या मित्राची ही नसेल. ती आणखीन कुणाची तरी असेल. पण ती माझी नाही असं सगळं मांडून वाचकाला एक वेगळीच उत्सुकता आणि किंचित गोंधळात टाकण्यात आले आहे. कथेतील विली त्याच्या मित्राची गोष्ट आपल्या समोर मांडतो. त्याचा मित्र जोसेफ आणि त्याने समाज कार्यासाठी वाहून देता येईल. या दृष्टीने चर्चमध्ये फादर होण्याचं व्रत स्वीकारलं होत. पण हा प्रवास तितका सोपा नव्हता. त्यांनी फादर होणं स्वतःहून स्वीकारलं जरी असलं तरी त्यांना त्याच्या मानाप्रमाणे, स्वातंत्र्य जगण्याची इच्छा होतेच. आणि ती प्रत्येकाला असते.पण समाजकार्य करत असताना. संसार आणि इतर गोष्टी यांचा ताळमेळ जमत नाही. ह्या मध्ये स्वतःला समाजासाठी पूर्णपणे वाहून देता  नाही येत. त्यामुळे फादर होणे किंवा आपले स्वातंत्र्य आयुष्य जगणं असे दोनच पर्याय उरतात. समाजातील विविध लोकांचे प्रश्न सोडवणे.त्यांना धीर देणे. देव आणि माणूस ह्यातील दुआ बनून आपण ही गोष्ट करू शकतो यामुळे समाजातील लोकांपुढे आपण एक चांगला आदर्श ठेऊ. आपण स्वतःला समाजकार्यासाठी वाहू शकतो. पण हे सगळं करत असताना स्वतःच्या इच्छा, अपेक्षाचा  बळी देणे हे कितपत योग्य आहे ह्या भोवती पूर्ण कथा आहे.कथेतील विल्यम आणि जोसेफ यांनी स्वतःच्या मोहावर आलेल्या परिस्थिती नुसार स्वतःला कसे सावरले, कसा त्याग केला आणि घेतलेली शपथ पाळत. समाजकार्याला वाहून दिले.

ओल हरवलेली माती या कथासंग्रहतील माझ्या मित्राची गोष्ट ही कथा इतर कथानपेक्षा वेगळी ठरते – कारण या संग्रहतील सुरवातीच्या कथामध्ये स्रीवर होणारा अन्याय, तिला नसेलेले  स्वातंत्र्य, तिला असलेले समाजातील दुय्यम स्थान या याच भोवती सगळया कथा आहेत.पण माझ्या मित्राची गोष्ट या कथेमध्ये पुरुषाला देखील त्याच्या ध्येयापर्यंत पोहचण्यासाठी करावा लागलेला त्याग याविषयी

बोलण्यात आले आहे काही वेळा त्यांना देखील स्वतःच्या मनाप्रमाणे वागता नाही येत. ह्याची मांडणी नीरजा ह्यांनी या कथेत केली आहे.

**- ऋतुजा बेंद्रे.**

**तृतीय वर्ष कलाशाखा**

# ओल हरवलेली माती - कथासंग्रह

## तिच्या मुलीचा बाप

नीरजा लिखित ओल हरवलेली माती या कथासंग्रहातील तिच्या मुलीचा बाप या कथेबदल-

कथेच्या सुरुवातीला वासंती हे पात्र वर्गात बालकवींच्या कविता शिकवताना पण तिचे मन उधास असते वर्गातली मुलं रमून गेलेली असतात कवितांन मध्ये आणि तास संपतो ती स्टाफ रूम मध्ये जाऊन मनात विचार करत असते की सुधाकर बददल कळल्या पासून अस होतंय का. तो बॉम्बे हॉस्पिटल मध्ये कॅन्सर सारख्या भयंकर रोगा बरोबर झुंज देतोय म्हणून तर त्याचा विचार येतोय का. की आपल्या मनात अजून ही काही असेल का त्याचा बदल काही कळत नाही ती घरी जाते तेव्हा तिला गीता चा फोन येतो की आजच्या पेपर मधली बातमी वाचलीस का "सुधाकर गेला" हे ऐकून वासंती ला धक्काच बसतो कसं बस ती साडी नेसते ऋजूता तिची मोठी मुलगी तिला जबरदस्ती पोळी खाऊ घालते आणि वासंती गीता सोबत नाशिक ला सुधाकर च्या राहत्या घरी जायला निघतात तेव्हा वाचकाला सुधाकर हा कोण असेल तिचा भाऊ , बाप, की अजुन कोणी हे कळत नाही.

प्रवासा मध्ये गीता तिला सुधाकर ला सोडल्या चे खरे कारण विचारते मधल्या काही वर्षात गीता इथे नव्हती म्हणून तेव्हा वासंती तिच्या सोबत काय काय घडले ते सांगू लागते ती सांगते जेव्हा सुधाकर सोबत लग्न झाले तेव्हा वासंती ला स्वतःचा हेवा वाटायचा कवी मनाचा हळवा व्यक्तिमत्त्व सोबत आपले लग्न झालंय. कॉलेज च्या सर्व मुलींना आपल्याला सुधा असाच नवरा हवा असे वाटत असते सुरुवाती चे काही वर्ष सर्व काही छान होते सुधाकर खुप प्रेम करायचा माझा वर.एक दिवस वासंती मस्त तयार होऊन त खिडकीत उभी राहून  सुधाकर ची वाट बघत असते तो येतो चिडलेला आणि तिला एक काना खाली मारून विचारतो की कोणत्या याराची वाट बघत आहेस हे ऐकून वासंती च्या पाया खालची जमीन सरकते तिला खूप दुःख होत त्या दिवशी तिला खूप मरतो सुधाकर आणि तसाच झोपून जातो सकाळी उठून एकदम तिची काळजी करू लागतो माफी मागतो कालच्या वागणुकी साठी आणि वासंती पण त्याचे ऐकते व विसरून जाते पण त्या नंतर ते नेहमी घडू लागते तो तिला मारत असतो तिला कधी डॉक्टर कडे जाऊ देत नाही कारण त्यांनी त्याच्या व्यक्तिमत्त्वा वर असर होईल ती त्याला डॉक्टर कडे घेऊन जाते त्याला डिप्रेशन आहे असे डॉक्टर सांगतो सुधाकर त्याचा गोळ्या खात असतो आणि जेव्हा तो त्या टाईम वर घेत नाही तेव्हा तो परत चिडत असतो तिला मारत असतो आणि वासंती सुधा विचार

करते की शरीराचा आजार असता तर आपण सोडले असते का त्याला मग हा तर मनाचा आजार आहे मग त्याला घेऊ सांभाळून काही दिवसांनी वासंती गरोदर राहते आणि सुधाकर च्या मारहाणी मूळे ते मिस्कॅरेज होते आणि ती मनात ठरवते की जोपर्यंत सुधाकर सुधारत नाही  तोपर्यंत बाळाचा विचार करायचा नाही पण काही वर्षांनी परत तेच ती गरोदर राहते ऋजुता असते तेव्हा तिसऱ्या महिन्यात तिला खूप मरतो आणि  ती घाबरून प्रभाकर कडे जाते कारण तेव्हा गीता इथे नव्हती. प्रभाकर खूप नशेत असतो तिला भीती वाटते पण ती विचार करते की काय करून करून करेल बलात्कार च ना करू दे पण प्रभाकर तिची काळजी घेतो रात्र भर बसून राहतो आणि सकाळी ती घरी जाते परत पाचव्या महिन्यात सुधाकर पोटात लाथा  मारत असतो ती पोटातल्या बाळाची शपथ घालते तर हे बाळ कोणाचे आहे असे विचारू लागतो त्या दिवसात प्रभाकर चे येणे जाणे वाढलेले असते त्या मुळे हे बाळ प्रभाकर चे आहे असे म्हणू लागला मारूनच टाकतो असे बोलून एक सणसणीत लाथ मारली पोटात तेव्हा थोडक्यात वाचलो आम्ही दोघी आणि त्या नंतर  ती तिचा आई कडे नांदेड ला जाते प्रभाकर सोडून येतो त्या नंतर सुधाकर पत्र लिहू लागला माफी मागू लागला होता पण वासंती चे बाबा ठाम होते निर्णयावर  तिथे ऋजुता झाली लगेच धावत धावत बघायला आला खूप कौतुक केले बाळाचे आणि नाव ठेवले जान्हवी पुन्हा वासंती त्याचा सोबत घरी आली सुरुवातीचे काही दिवस चांगला होता आणि मग परत तो  तिला मारू लागला आता तर ऋजुता ला ही दूध पिऊन दयायचा नाही तिला हॉल मध्ये रडत ठेवायचा आणि मला बाथरूम मध्ये बंद करायचा एक दिवस तर हद्दच केली वासंती तिला पाजत होती ऋजुता ला, तो आला तिचा जवळ जाण्यासाठी पण ती म्हणाली थांब येते मी तर रागवून ऋजुता लांब केले आणि तसाच तुटून पडला माझा वर मी चिडले तर माझा पेक्षा मुलगी महत्वाची झाली की ही मुलगी प्रभाकर ची आहे म्हणून येवढी काळजी घेतेस खर सांग कोणाची आहे ती आणि मला ओढत बेडरूम मध्ये घेऊन गेला ऋजुता रात्र भर बाहेर रडत राहिली आणि आत मध्ये माझे स्तन पिळून चिळकांड्या उडवत राहिला. तेव्हा तिने शेवटचा निर्णय घेतला आणि प्रभाकर ला बोलून घेतले आणि नांदेड ला घेऊन गेला घटस्फोट साठी अर्ज केला सगळे पुरावे माझा बाजूने होते म्हणून तो झाला ही.

ऋजुता मोठी होत होती प्रभाकर यायचा तिला भेटायला ऋजुता त्याचा अंगावर खेळून मोठी झाली बाबा असे हाक मारायला त्यानेच शिकवले तिला  जेव्हा पासून समजायला लागले होते तेव्हा पासून तिने प्रभाकर लाच आपला बाबा मानले होते प्रभाकर ने खुप जीव लावला होता ऋजुता  ला आणि मग वासंती ने पण प्रभाकर शी लग्न करायचे ठरवले  सगळे पुरुष सारखे नसतात प्रभाकर ने खुप समजून घेतले

वासंतीला आणि ऋजुताला पण वासंती वर कधी कसले बंधने नव्हती घातली तिची काळजी घेत असायचा नाशिकहून परत येत तोपर्यंत तिची वाट बघत होता जेवायचा थांबला होता प्रभाकर ती आल्या वर सोबत जेवण केले ऋजुता ने स्वयंपाक केला होता आपली मुलगी किती शहाणी झाली म्हणून माथ्यावर चुंबन पण घेतले.

बोलता बोलता त्या दोघी नाशिक ला पोचल्या तिथे सगळे जन वाट बघत होते तिथे अशोक आणि मीनल तिथे होते अशोकचे म्हणे होते की ऋजुता ला आणायला पाहिजे होते तू शेवटचे बापाला बघायला तरी शेवटच्या काळात सुधाकर ला त्याच्या चुकांची जाणीव झाली होती विचारायचा तो ऋजुता बदल अशोक गीता मीनल ला म्हणून तरी आणायचे ऋजुता ला तिथे वासंती ला तिची सासू नणंद खुप काही बोलतात वासंती तशीच निघते घरी यायला परत पण तिचा मनात भीती असते की जर ऋजुता ला कळले की सुधाकर तिचा खरा बाप आहे तर की होईल ती मला समजून घेईल का ती हे प्रभाकर ला सुधा सांगते तेव्हा प्रभाकर म्हणतो की मला माझा स्पर्शाच्या नात्यावर विश्वास आहे ऋजुता समजून घेईल जेव्हा कळेल तेव्हा बघून घेऊ आणि असे बोलून तो वासंती ला झोपायला सांगतो आणि स्वतः लाईट बंद ना करता विचारात राहतो.

ह्या कथे तून आपल्याला ही कळते की अन्याय सहन नाही करायचा आपले मत सुधा महत्वाचे असते स्वतःचा विचार करणे काही चुकीचे नाही फक्त रक्ताचे नाते नाहीतर स्पर्शाचे नाते सुधा खुप काही करू शकते.

नीरजा ह्यांनी खुप सुटसुटीत मांडणी केली आहे कथे मध्ये आधी काय घडले आता काय घडतंय ते सविस्तर कळते प्रभाकर आणि सुधाकर दोघांना मध्ये काय फरक आहे दोघांन चे विचार कसे वेगळे आहेत ते कळते नात कसे असायला हवे ते  खूप चांगले उदाहरण देऊन सांगितले आहे.

**- प्रगती प्रवीण निकम**

**तृतीय वर्ष कलाशाखा**

# शाळा - कादंबरी

मिलिंद बोकील लिखित शाळा कादंबरी - आपल्याला पुन्हा एकदा शाळेत घेऊन जाते. या कादंबरीत 1975 साली, इयत्ता 9 वी शिकणाऱ्या, पौगांडावस्थेतील, चार पाच शाळकरी मित्रांच्या आयुष्यात त्या एका  वर्षात घडलेल्या घटनाभोवती कादंबरी ची मांडणी आहे. तसेच कादंबरीतील मुख्य पात्र असलेल्या मुकुंद जोशी याच्या बिल्डिंग मध्ये घडणाऱ्या घटनांच्या अनुषंगाने 1975 साली भारतात लागू झालेल्या देशांतर्गत आणीबाणी चे देखील संदर्भ दाखवण्यात आले आहेत.

कादंबरीमध्ये मुकुंद च्या मनातील भावविश्वाची मांडणी करण्यात आलेली आहे. कादंबरी मध्ये नववीचे वर्ष नुकतेच सुरु झालेले आहे. मुकुंद अभ्यासात बऱ्यापैकी हुशार असतो. त्याचा 4,5 मित्रांचा ग्रुप असतो. सगळे हुशार नसले तरी त्यांचा ग्रुप मजेशीर आहे. ते शाळेत जाण्याआधी बिल्डिंग वर जमायचे. मग वरून खाली येणाऱ्या -जाणाऱ्या मुला - मुलींवर तसेच शिक्षकांवर सुद्धा कंमेंट करणे. इत्यादी गोष्टी त्यांचा ग्रुप करत असे. तसेच शाळा भरल्यावर शाळेचे वातावरण, मोजके आवडते शिक्षक,आवडते विषय, मित्र - मैत्रिणी, सुऱ्या कडून होणारा शिव्याचा वापर, काही लैंगिक प्रश्न, त्या कडे पाहण्याचा प्रत्येकाचा वेगळा  दृष्टीकोन, तसेच या कादंबरीत काही वेगळे वाक्य प्रयोग  करण्यात आलेला आहेत -

- कोणी डाउट खाऊ नये.

- सुम मध्ये पाहणे.

- मला लाईन देतेस का असं विचारणे?

या सगळ्या गोष्टींची मांडणी मिलिंद बोकील यांनी या कादंबरी मध्ये अगदी बिनधास्त पणे आणि खरी मांडली आहे.ही कादंबरी शाळेत गेलेल्या प्रत्येकासाठी अर्पण करण्यात आलेली आहे. वाचताना अर्थातच आपल्याला आपल्या शाळेची आठवण येते. तसेच आपण देखील आपण आपल्या शालेय जीवनात असेच वागलो आहोत. अश्या आठवणी जाग्या होतात.

पुस्तकाच्या  मलपृष्टा वर लिहिलेला मजकूर फार सुंदर आहे  - तो असं म्हणाला

त्या दिवशी मला कळलं की

शाळेची खरी मज्जा कशात आहे ते..

इथं वर्ग आहेत, बाक आहेत,

पोरपोरी आहेत, सर आहेत,

गणित आहे, भूगोल आहे, नागरिकशास्त्र सुद्धा, पण आपण त्यात कशातच नाही.

आपण त्या गाईच्या पाठीवर

बसणाऱ्या पांढऱ्या पक्ष्यांसारखे मुक्त आहोत.

ह्याच्या शाळेत असलो तरी आपल्या मनात एक वेगळीच शाळा भरते.

खास एकट्याची...

त्या शाळेत वर्ग नाहीत, फळा नाही,

शिक्षक नाहीत. पण त्यातलं शिकणं

फार सुंदर आहे..

**-ऋतुजा बेंद्रे**

**तृतीय वर्ष कलाशाखा**

# ओल हरवलेली माती- कथासंग्रह

## मासा  आणि आक्रमकता

नीरजा लिखित ओल हरवलेली माती ह्या कथासंग्रहातील मासा आणि आक्रमकता  ह्या कथे बद्दल - कथे मध्ये नवरा बायको मधला संवाद आहे त्यात ती म्हणजे बायको आणि तो म्हणजे नवरा असे आहे. कथेचा सुरुवातीलाच तो उशिराच आला त्या दिवशी ह्या वाक्याने सुरुवात होते म्हणजे तो नावाचा पात्र नेहमी उशिरा येतो घरी , आणि ती त्याची वाट बघून बघून कंटाळून मासा चा आमटीचा वासानी तिला भूक लागते आणि ती एकटीच  जेवायला बसते आणि बसताना दरवाजा च्या बेल च बटण बंद करते. तो जेव्हा घरी येतो आणि खूप वेळ बेल वाजवून दार उघडले नाही म्हणून तो स्वतःह  कडे असलेल्या चावी नी दार उघडतो आणि बघतो तर काय त्याची बायको म्हणजे ती मासे खाण्या मध्ये गुंतलेली असते आणि ते पाहून तो खूप रागवतो

तो तिला प्रश्न विचारायला सुरुवात करतो पण ती पूर्ण लक्ष मासा वरच ठेवते आणि त्याला उत्तर देत असते त्याला आणखी राग येतो कारण त्याचा असे म्हणने असते की नवरा घरी आला की बायको ने हसून  त्याची विचारपूस केली पाहिजे त्याची दखल घेतली पाहिजे पण ती म्हणते मी दखल घेतली मगाशीच हसून असे चालू असतेच तेवढ्यात ती त्याच्या चुका दाखवून  द्यायला सुरुवात करते कारण तो पुरुष प्रधान समाजाचा विचारांचा आहे त्याचे म्हणणे असते की नवऱ्याचा आधी बायकोने जेवायला बसायच नाही आणि ह्याचं गोष्टी मुळे त्यांच्यात ह्या    बोलण्याला सुरुवात होते. आणि ती तिला कोणता कोणता  स्वभाव त्याचा आवडत नाही हे ती त्याला सांगायला लागते की तू दररोज घरी आलास की सोफ्या वर बसून ,टीव्ही मध्ये कोणत्याही मालिकेतील बाई कडे पाहत मला लवकर जेवायला वाढ खूप भूक लागलीय हेच बोलतो नेहमी  हेच मला आवडत नाही .

मग तो लगेच विषय बदलायला सुरुवात करतो कारण की त्याला त्याची चूक दिसू लागते आणि तो तिला म्हणतो की तू मासा खाल्लास म्हणून तू एवढी आक्रमक झाली आहेस तुझा डोळ्यात मला आज वेगळीच भूक दिसते नेहमी सारखी नाही, मग ती म्हणते की आज मला भूक लागलीच नव्हती तरी मासा

चा आमटीने च्या वासानी मला जेवणाची वेळ झालीय हे आठवले म्हणून मी जेवायला बसले .असे सुरू असतेच तेवढ्यात त्याच्या बोलण्याचा विषय हा त्याचा दोघांमधील प्रेम ह्या विषयावर जातो  त्याच्या म्हणेन असते की प्रेम करताना सर्वांची परवानगी घायची असते आणि मीही घेतो दररोज तुझी परवानगी प्रेम करायचा आधी , त्या वर ती म्हणते पण बायकोची इच्छा नसेल तरी प्रेम करायचा का ? त्यावर तो म्हणतो की मी परवानगी घाययच काम करतो पण मी माझा काम करणार तुला खुश करायचा तुझ मन असो किंवा नसो . असाच त्याचं बोलणे सुरू असतेच तर तो सर्व चूक त्या मासा चा आमटिवर ढकलतो आणि तिला बोलतो मला ह्या अख्या घरात मासा चा आमटी चा वास येतोय आणि तो मग विषय सोडून तसाच उपाशी पोटी झोपून जातो.

पण ती हे सगळे मुद्दामून करतं असते कारण तिला हे सगळे तिचा मनातून बाहेर काढायचा असते आणि तिचा नवऱ्याचे विचार तिला बदलायचे असतात , त्याच्या चुका तिला दाखून द्यायचा असतात म्हणून ती हे सगळे करतं असते.

ह्या कथेतून आपल्याला असे समजते की समोरच्याचा चुका आपण दाखऊन दिल्या पाहिजे आणि त्याची विचार करायची पद्धत आपण बदलण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे ते ही शांतापूर्ण पद्धतीने.

नीरजा ह्यांनी खूप चांगल्या प्रकारे ही कथा आपल्या समोर मांडली आहे . छोटी कथा आहे पण खूप काही सांगून जाते ही कथा की कशा प्रकारे पुरुष हा त्याचा बायको वरती अन्यान करतं असतो आणि बायको ते कश्या प्रकारे शांती मध्ये त्याला ते पटून देते ह्याचं मस्त उदाहरण नीरजा ह्यांनी ह्या कथेत सांगितले आहे. कथे मध्ये कुठे पात्राचे नाव आले नाही तरी ही पटकन समजून येते की कोणाचा संवाद चालू आहे ही कथा तृतीय पुरुषी  असून वाचताना असे वाटते की आपल्या समोरच घडलेले असावे हे इतकी सुटसुटीत मांडणी आहे

**- रविंद्र नरेश मांजरेकर**

**तृतीय वर्ष कलाशाखा**

## कथासंग्रह- ओल हरवलेली माती

## कथा - निर्णय

नीरजा लिखित ओल हरवलेली माती या कथासंग्रहातील निर्णय या कथेबदल -
कथेच्या सुरवातीलाच आपल्याला दिसते की कुठे  तरी जाण्याची तयारी करत आहे. बॅग भरत आहे आणि ती खूप गहण विचारात आहे असे कळून येते.आणि ती निघताना बांगड्या आणि मंगळसूत्र सोबत घेते. लग्नाला सतरा वर्ष होऊन ती असा निर्णय का घेते हे वाचकांना कळात नाही.त्यानंतर ती घरातून जायला निघते.तेव्हा तिला वाटते तिचा नवरा म्हणजेच जयंता तिला आडवेल तिला थांबवेल.जाऊ नको असे बोलेल पण अस काहीच झाल नाही.तिने स्वतःला पूर्ण वाहून घेतलं होत संसारामध्ये तरीही असा निर्णय का ?

अनु घरातून निघते तेव्हा अनुच्या मनात विचार चालू असतात. लग्नाला सतरा वर्ष होऊनही आपलयाला मूल नाही. त्यामुळे आलेला तणाव व आपल्यात व नवऱ्यात आलेला दुरावा हा फक्त एका मूल न झाल्यामुळे दुरावा आहे.तीनवेळा गर्भ राहूनही तो वाढला नाही.त्यामुळे जयंता निराश झाला होता.सुरवातीला जयंता अनुला समजवायचा होईल आपल्याला मूल तिच्यासोबत डॉक्टर कडे देखील जायचं तिची खूप काळजी करायचा.पण जयंता नंतर खचून गेला त्याच नैराश्य वाढत गेलं. तिला तो एकटीलाच डॉक्टर कडे पाठवायचा.अनुला वाटत होते जयंता कामामुळे नसेल त्याला जमत पण तस नव्हतं जयंता  कंटाळलेला ह्या सर्व गोष्टींना जयंताला वाटू लागले आपल्यात दोष नसताना आपण का नाकारायचे बाप होण.जयंताला त्याची आईने सारखं मुलाबदल विचारायची.त्यामुळे जयंता चिडचिड होत होती.तेव्हा जयंता  आईला रागात बोलला मग काय सोडून देऊ क तिला?ते अनुने ऐकलं आणि तिला कळलं की जयंताला ही कंटाळा आहे.आपणच त्याची वंशवेल वाढवण्यात कमी पडतो आहे असे अनुला वाटू लागते.आणि ते करण्यात आपण कमी पडलो की बायको ची किंमत कमी होत जाते.

ती आईकडे पुण्याला निघून जाते .पुण्याला घरी पोचताच आई छान विचारपूस करते परंतु नंतर आई देखील विचारते का आलीस तू जयंताला ल सोडून? अनुला वाटत असते की आई तरी आपल्याला समजून घेईल.पण अनुची आई देखील अनुला समजून घेत नाही.अनूची आई अनुला हेच समजवते की

नवराच सर्व काही असतो समाजात एकटी राहणाऱ्या बाईला समाज नीट बघत नाही.आणि ते तुला काही वेगळं सांगायला नको.नवऱ्याशिवाय आयुष्य काढणं खूप कठीण असत.अनु आईला बोलते तू देखील काढलस की संपूर्ण आयुष्य एकटं.तू देखील एक आदर्श शिक्षिका आहेस.आणि तूच माझं आदर्श आहेस.त्यावर आई बोलते आदर्श वगैरे काही नसत.एकटं बाईने जगणं खुप कठीण असत वाईट नजरेने तिच्याकडे बघितलं जात. आणि अनु जयंताला सोडून आली आहे हे  शेखरला देखील आवडणार नाही.शेखर अनुचा भाऊ तो सर्जन आहे.तिची वहिनी विनिता ती देखील गायनॉकॉलॉजिस्ट आहे .आणि विनिता अनुची वहिनी तर आहेच पण विनिता अंनुची लहानपणीची मैत्रीण देखील आहे .

तसही शेखरला अनु आलेली आवडलेल नव्हतं पण विनिता खुश होती .पण विनितला बघून अनुला कळते की वनिता खुप दडपणाखाली आहे .त्याच रात्री विनिता बाल्कनीत रडत असते.आणि अनुलही झोप येत नसते म्हणून अनु बाहेर येते तेव्हा अनु विनिटला रडताना बघते आणि तिच्या जवळ जाते .विनितलाही अनुसोबत खुप काही बोलायचं असत.विनिता अनुला दुसऱ्यादिवशी तिच्या क्लिनिकमध्ये घेवून जाते.त्यादिवशी विनिताचा वार नसतो तरी देखील विनिता जाते आणि विनिता अनुला तिच्या खुर्चीवर बसवते .कारण त्यावेळेस विनीतला अनुच्या सल्याची गरज असते. विनिता अनुला सांगते मे पुन्हा गरोदर आहे.आणि बोलते.तु दोन मुली नंतर ऑपरेशन करणार होतीस ना? त्यावर विनिता तिला सांगते मला तर करायचंच आहे. पण शेखरला ते मान्य नाही.त्यावर अनु विनितळा जरा चिडूनच बोलते की तू स्वतः गायनॉकॉलॉजिस्ट आहेस .तू दुसऱ्यांना फॅमिली प्लॅनिग चे महत्व सांगते आणि तूच अशी वागते .त्यावर विनिता अनुला सांगते तुझ्याच भावाला मुलगा हवा आहे.ह्यावर अनूचा विश्वास बसत नाही.दोन सोन्यासारख्या मुली असताना कशाला पाहिजे मुलगा अनु वनिता ला बोलते.त्यावर विनिता बोलते मुली आणि सोन्यासारख्या? मुली सोन्यासारख्या असतात का त्या मातीच्या बाहुल्या आपलयाला खेलावस वाटत म्हणून घटल्याला अश्या बहुल्यामुळे घर नाही सजत आपली अनुला काही कळत नव्हतं अनु विनिताला विचारते आईला माहीत आहे का.हो मग विनिता म्हणाली त्यांना तर दिवस गेल्याच कळल्यावर खुप आनंद झाला. एकुल्यात्या एक मुलाची वंशवेलीवर आणखी एक फूल येणार ह्या कल्पनेनेच त्या खुश होत्या.

विनिताने अबॉर्शन करण्याचा निर्णय घेतला त्यावेळी शेखर आणि आईने खुप समजवले की अबॉर्शन नको करुस त्यांनतर तिला धमकी दिली. अबॉर्शन करायचं आहे कर पण आधी मुलगा आहे की मुलगी हे चेक कर. ह्या गोष्टीवरून खुप आदळ आपट झाली. विनिता जबरजस्तीने  चेक करते . रिपोर्ट आलेला

असतो आणि कळत की मुलगी आहे म्हणून त्यावर शेखर विनिता ला आता अबॉर्शन कर. शेखरने डॉक्टरची तारीख सुद्धा घेतलेली पण फक्त मुलगी आहे म्हणून अबॉर्शन करायला विनिताची तयारी नव्हती.

अनु म्हणते की ही मुलगी मला दे मे सांभाळते पण त्यावर विनिता बोलते की तू दत्तक घेशील ग पण पुढच्या अश्या किती मुली दत्तक घेशील आणि प्रश्न मूल दत्तक घेण्याचा किंवा अबॉर्शन करण्याचा नाही .प्रश्न आहे आपल्या दोघींचा सन्मानाचा असे विनिता म्हणते केवळ मूल नाही म्हणून जयंताला तुझ्यापासून सुटका हवी आहे .जर त्यातच दोष असत तर जयंता राहिला असता ना ? विनिता अनुला सांगते तू आदर्श बायको आणि नाही होऊ शकली. म्हणून त्याला तू नको असणं हे पटत नाही. माझही तसच आहे.मुलगा जन्माला घालणारी बायको हे सर्टिफिकेट जो पर्यंत भेटत नाही तोपर्यंत विणीतला शेखर ते ऐकावं लागेल.आणि विनीताला एक स्त्री असून जन्माला येण्याचा मुलीला मारणं ही कल्पनाच सहन होत नाही.

काल अनु येईपर्यंत विनिता व्दिधा मन: स्थितीत होती.पण काल अनु एवढा मोठा निर्णय घेवून आली.विनितलं तिचा निर्णय घेण्याचं बळ आल. आता शेखरला मी हवी असेन तर त्याने देखील विनितचा मतांचा विचार करावा नाहीतर. शेखरने न सांगता विनिता शेखरला मोकळं करीन आणि तीन मुलींना चांगलं वाढविन.

स्त्री सन्मान देखील तितकाच महत्वाचा आहे. जितका पुरुष सन्मान. आपण ज्या समाजात राहतो जिथे पुरुषाला प्रथम स्थान दिलं जातं .आणि स्त्रियांना नेहमी दुय्यम स्थान दिलं जातं.ह्या कथेतून आपलयाला समजून येत.स्त्रीला देखील स्वतंत्र आहे. स्त्रिया देखील पुरुषांऐवढ्या स्वतंत्र आहेत.आणि मुलगी नको हा एक स्त्रिजातीचा आपमान आहे.आणि त्या गोष्टीला आपण कधीच पाठींबा देणार नाही.

निवेदकानी कथेची मांडणी खुप सुटसूटीत प्रकारे मांडणी केली आहे. व कथेच्या उदाहरणातून लोकांपर्यंत कथेचा मूळ अर्थ अगदी सहजपणे कळतो. कथेवरून स्त्रीवर होणारा अन्याय स्त्रीला नसलेले स्वतंत्र तिला समाजात असणारे दुय्यम स्थान हे निवेदकानी निर्णय ह्या कथेद्वारे अगदी उत्तम प्रकारे मांडले आहे.

**- अनुष्का देशमुख**

**तृतीय वर्ष कलाशाखा**

# कथासंग्रह- ओल हरवलेली माती
# कथा- गुंता

गुंता या कथेमध्ये कुमुद नावाची एका मुलीला, पत्नी,आई आणि आदर्श सून हे सगळ बनण्याची इच्छा होती,पण मात्र काही कारणास्तव यातील एकही गोष्ट करता आली नाही.कारण की कुमुद ला सासु ,पती आणि मुलामुळे झालेला त्रास त्यामुळे इत्यादी गोष्टी ती नाही बनू शकली.

या कथेची सुरुवातच कुमुद च्या भाऊ पासून होते.कारण सुभाष चे म्हणने होते की,कुमुद ही पालखी अटेंड करून जावी आणि ही पालखी अटेंड नाही केली काहीतरी अघटीत घडेल.पण कुमुद मात्र माहीत होत की आजुन आणखी की अघटीत होन बाकी आहे.कुमुद सुभाष म्हणते की मला जर बोर होताना तुला बघायचं नसेल तर तू माझ्यासाठी मासिक घेऊन ये. कारण त्याने माझा चांगलाच वेळ जाऊ शकतो. त्यानंतर डब्यात जागेवर बसण्यासाठी लगबग सुरू असते तेवढ्यात एक कुटुंब कुमुद च्या समोर येऊन बसते.या कुटुंबामध्ये कुमुद च्याच वयाची एक स्री असते आणि आणि तिचा प ती ही असतो. व दहा-बारा वर्षांची मुलगी ही असते. जेव्हा रेल्वे वेग घेत तेव्हा ती स्री खिडकीला डोके टेकवून व डोळे बंद केलेले असतात. व तिच्या डोळयांतून पाण्याची धार येत असते. मग कुमुद हे बघत असताना तिला वाटत की काय हीच्या बरोबरं झालं असेल इथे झाल असेल की मुंबईला काही झाल असेल.तेव्हा कुमुदने राहिला टोफी चा इशारा देऊन स्वतः कडे बोलविले ,मग कुमुदने तिला तिचे नाव विचारलें नंतर कीतवित आहे हे ही विचारलें नंतर कोणत्या शाळेत आहे ही विचारलें नंतर गोव्याला कोण आहे,मग कुमुदने विचारलें की एवढ्या उशिरा का आलात ! सगळी लोक तर मे महिन्यात येतात ना..मग राही म्हणाली दादाचा रिझल्ट होता म्हणून उशीर झाला.दादाचा विषय काढताच राही पळून गेली.त्यानंतर कुमुद ने स्वतः चा विषय काढला आणि कुमदला पण दोन मुलं होत सन्मित्र आणि सुबोध होती .

सुबोध सारखाच आईचा पदर धरत असल्यामुळे विनोद त्याला स्वतः सारखा बनविण्याचा प्रयत्न करत असे पण मात्र विनोद ही माहीत नव्हते की सुबोध त्याच्या पुढचा निघेल म्हणून,पण कुमुद ला सारखा प्रश्न पडत असेल की सुबोध गोव्याला का आला असेल आणि याचे इथे काय काम असेल. सुबोध ची आढवून येऊन कुमुद ला सुद्द्धा हुदका येऊ लागला.आणि हे सगळ समोरच्या क्या स्रीने पाहिले.मग त्या स्त्री ने विचारले की काय झालं तुम्हाला,मग कुमुद ने सांगितले की पंधरा दिवसापूर्वी माझा मुलाचा अपघात झाला.हे ऐकून ती स्त्री सुद्धा आश्चर्य चकित झाली ती म्हणाली की.माझाही मुलगा

पंधरा दिवस झाले त्याचा मृत्यू झाला.मग त्या स्त्री ने सांगितले की कांद्दोलीला बीचवर पोहत असताना चक्रीवादळात गेला तसा दिसलाच नाही . अशाप्रकारे त्याचा अपघात झाला.

सुबोध वयात आल्यानंतर त्याची आजी गेली त्याच्या डोळ्यातून एकिही अश्रू आलेले नव्हते आणि कुमुद च्या ही नव्हते आहे .फक्त रडत होता मात्र तो विनोद .नंतर मात्र सुबोध अगदी वेगळ्याच वळणावर गेलेला आपल्याला दिसतो .नंतर छोट्या मोठ्या चोऱ्या करू लागला आणि कुमुद च्या पर्समध्ये आणि विनोद च्या खिश्या मधले दहा - वीस रुपये चोरू लागला होता. एकदा त्याला कुमुद ने  कॉम्प्युटरचा कोर्स करायला लावला आणि तिच्या बँकेत अकाउंट असणाऱ्या एका माणसाकडे नोकरीला लावला.तेव्हा निर्धास्त झाली होती कुमुद,पण मात्र नंतर एका मित्राच्या मदतीने कॉम्पुटर विकून टाकला होता त्याने,त्या कॉम्पुटर ला विकून आठ दिवस त्याने बार मधे खुप पैसे उडवले होते.त्यानंतर त्याने बनावट कंपनी दोन वर्षात पैसे दुप्पट करून देण्याची स्कीम काढली . छोटी मोठी रक्कम घेतली लोकांकडून आणि साऊथ ला जातो म्हणून म्हणाला होता.

मग एके दिवशी दारात पोलिस आले तेव्हा कळलं की तीन लांखांचा गंडा घालून मोकळा झाला होता लोकांना.ते दिवस वाईटच गेले होते घरातून बाहेर पडायची लाज वाटत होतो सुबोध  पोलिस काही दिवस  घेऊन गेले.पण त्याच्या साठी पैशांची सोय करायची आपल्याला ते पण विनोद ला न कळता,विनोद बोलतच होता की सुबोध आता सोडवून आणु नको म्हणून.पण मात्र कुमुद ला हे मात्र बघवल नाही. म्हणून तिने पैशांची सोय करून सुबोध ला पुन्हा बाहेर काढले होते.त्यांनतर थोड्या दिवसांनी कुमुद ने माधुरी बद्दल ऐकले,आणि एक दिवस सुबोध ने माधुरीला घरी आणले तेव्हा कुमुद माधुरीला पाहून खुप खुश झाली.त्यानंतर त्यांच्या चांगल्यात गप्पा रंगल्या.मग माधुरीने सांगितले की सुबोध ने मला हा नेकलेस हा गिफ्ट केलेला आहे . हे बघून कुमुद का टेन्शन आले होते.मागच्या महिन्यात सुभाष आणि सुषमाने  कंप्लेंट केली होती की माझा नेकलेस चोरीला गेला आहे म्हणून आणि आता कळतंय की तो नेकलेस सुबोध ने चोरला आहे म्हणून.आता कुमुद ला प्रश्न पडत आहे की माधुरी ला माहिती आहे की सुबोध चा अपघात झाले आहे .हे तिला कळतच काय वाटेल ,कारण हे दोघे नुकतेच लग्न करणार होते. त्यामुळे माधुरीला काही सांगताच तिने हे सगळे काम उरकून टाकले होते..

गुंता या कथे मधे आपल्याला हे शिकायला मिळते जर एका कुटुंबामध्ये चांगल्या विचारांची देवाण घेवाण न झाल्याने नात्यात गुंता अधिक वाढत जातो.हे आपल्याला शिकायला मिळते.

**- सागर जाधव**

**तृतीय वर्ष कलाशाखा**

# ओल हरवलेली माती- कथासंग्रह

## एकाकी सूर्य वितळताना- कथा

नीरजा द्वारे लिखित ओल हरवलेली माती या कथा संग्रहातील एकाकी सूर्य वितळताना या कथेची थोडक्यात मांडणी.

या कथेमध्ये सुरुवातीला विद्या ही अपूर्वला बजावत असते.विद्या तिच निरीक्षण करत असते; आणि विद्याला अपूर्वा मध्ये काही त्रुटी जाणवतात,महत्त्वाचं म्हणजे तिच्यात निरीक्षण शक्ती नाही अस विद्याचचं मत असत.विद्या अपूर्वाला म्हणते की तू स्वतःहून पुढाकार घेऊन आज पर्यंत काय केल आहे?विद्याने असा प्रश्न केल्यावर अपूर्वाला तिन केलेल्या सर्व चांगल्या गोष्टी आठवतात.अपूर्वा बरीच चांगली काम करत होती.पण त्याचा उल्लेख रिपोर्टमध्ये करत नव्हती.विद्या अपूर्वाला म्हणते तुझे वडील इतके हुशार पण तू तशी नाहीस.अपूर्वाला तेव्हा असं वाटत की जे वडीलांना येत ते तिलाही यायलाच हवं का?

फुकट वेळ घालवन गुन्हाच आहे अस विद्या सर्वांना आणि स्वतःलाही समजावत असते.मावशी चहा बरोबर घरी आलेली पत्र देखील विद्याला आणून दिली.विद्या ती पत्र पाहते

बरीच पत्र तिच्या कामा संदर्भात असतात पण एक पत्र विना नावाच होत.ते विद्याने उघडुन पाहिल तेव्हा विद्याला धक्का बसला ते पत्र वैदेहीच म्हणजे तिच्या मुलीच होतं.वैदेही पत्रात लिहिते की दिल्लीत मजेत असते.वैदेही आणि अमित यांनी विद्याच्या मनाविरुद्ध लग्न केलेलं.विद्याच्या मते अमित आणि त्याची माणसे असंस्कारी आणि व्यवहारी आहेत.पण ती माणसे तशी नाहीत.वैदेहीच्या पत्रातून असही कळत की विद्याच्या तिच्या मुलांकडून अर्थात विशाल आणि वैदेही कडून खूप अपेक्षा होत्या.विद्या सारखंच तिच्या पोरांनी समाजकार्यात झोकून द्याव अस विद्याला वाटत.विद्या विशालच लग्न त्याच्या मनाविरुद्ध स्नेहलशी लावून देते.नंतर विशाल आई चा राग स्नेहल वर काडायचा.पुढे स्नेहल आणि विशालच भांडण होतं आणि त्या बरोबर त्यांचा संसार ही मोडतो.या मोडलेल्या संसाराची जबाबदारी विद्या हातात घेते आणि ती स्नेहालच्या बाजूने उभी राहते.विशाल च मत न ऐकताच त्याला घराबाहेर काढते.

वैदेही जेव्हा अमितशी लग्न केलं तेव्हा तिच्या मनात धाकधूक असते.पण दोन वर्ष संसार केल्यावर तिच पाऊल बरोबर पडल अस अपूर्वला वाटतं.वैदेही आई होणार अशी बातमी विद्याला

देते.वैदेही अस म्हणते की विद्या/आई बद्दल आता तिच्या मनात राग नाही.विद्या पूर्ण पत्र वाचते तेव्हा तिला वाटत की दोन - अडीच वर्षात अपूर्वा इतकी मोठी कशी झाली याच विद्याला नवल वाटत.

विद्याला थकल्या सारख वाटत असत म्हणून ती संध्याकाळच्या मीटिंग ला स्नेहल ला जायला सांगते.विद्या तिच्या खोलीत जाते तेव्हा तिला आठवत अस कामाच्या गर्ततेत अडकल्या पासून संध्याकाळच्या वेळेत विद्या तिच्या खोलीत कितीतरी दिवस आलेलीच नसते. ति खिडकी उघडते तेव्हा छान सुर्यास्ताचा प्रकाश आत येतो आणि पूर्ण खोलीत पसरून जातो.त्यामुळे तिच मन प्रसन्न होत.

प्रकाश चा विद्याला फोन येतो. व त्यांच भेटण्याच कार्यक्रम ठरतो.प्रकाश हा अपूर्वाचा बाबा आणि विद्याचा कॉलेज मधील जिवलग मित्र.प्रकाश येणार म्हंटल्यावर ती स्वतःला आवरायला लागते. अस तिला कॉलेजच्या दिवसात सुद्धा वाटायच.सुंदर दिसावं,प्रकाशंन तिच कौतुक कराव अस विद्याला वाटायच.प्रकाश घरी आल्यावर दोघांच्या अपूर्वा संदर्भात गप्पा सुरू होतात.विद्या म्हणते अपूर्वा बाकी मुलांपेक्षा खूप मागे आहे;तिच्यात परफेक्शन नाही.यावर प्रकाश म्हणतो परफेक्शन म्हणजे परिपूर्णता आणि ती कोणातच नसते.प्रकाश तुझ्या सारख्या हुशार मुलाच्या मुलींकडून अपेक्षा ठेवायच्या नाहीत का?अपूर्वा माझी मुलगी म्हणजे ती हुशार असलीच पाहिजे अस काही नाही.वैदेही च्या बाबतीत तू थोडी चुकलीसच विद्या.तिला गाणं-नृत्य शिकायच होत.पण विद्याच्या दृष्टीने ते नाच-गाणं आणि वेळेचा अपव्यय होता.वैदेही लग्ना नंतर शिकते आहे.विशाल आणि गौरीचही चांगल चाललं आहे अस प्रकाश सांगतो विद्याला.गौरी ब्युटी पार्लर चालवते हेही विद्याला पटत नाही.

विद्याच कामावर आणि समजा सेवेवरच प्रेम असत.अशोक विद्याच्या प्रेमात पडला आणि शेवट पर्यंत राहिला. विद्याचही प्रेम होत पण त्यात उपकराचीच भाषा असायची.अशोक ला आपल्या सारखी बायको भेटली नसती हेच विद्या त्याला सांगत असायची.अशोक तिच्यावर कविता करायचा तेव्हा विद्या दुसऱ्या कामाच्या विचारातच असायची.विद्याला अशोक मध्ये रमताच आल नाही.

प्रकाश विद्याच्या सर्व प्रश्नांची उत्तर अगदी समंजस पणे देत होता. विद्याच्या प्रत्येकाकडून अपेक्षा होत्या.आणि त्या अपेक्षा तिनेच लादलेल्या. सर्व गोष्टी विद्याच ठरवायची.प्रकाशंन शांतपणे दिलेल्या उत्तरातून विद्या हिरमुस्ते.ते जेवायला बसतात तेव्हा प्रकाश तिला नीट समजावतो.

प्रकाश घरी गेल्यावर विद्या पायरीवर बसते.तिला प्रकाशने दिलेल्या समजुतीने तिच्या चुका उमगतात. विद्या तिच्या बागेकडे पाहते.कितीतरी दिवसांनी ती बागेकडे इतक निरखून पाहत असते.बागेकडे पाहत असताना तिला जाणवत सर्व व्यापात ती इतर गोष्टींकडे लक्षच देत नव्हती.जगायचं तीच राहूनच गेलं हे तिला कळत.तेव्हड्यात स्नेहल घरी येते व मीटिंगच सर्व काही सांगते.तेव्हा विद्या तिला म्हणते आता फार कामं हातात घेवू नको काही महिने वेळ मिळेल का नाही सांगता येत नाही.विद्या आजी होणार असते.हे ऐकल्यावर स्नेहलला आश्चर्य वाटत.पुढे विद्या स्नेहलला म्हणते तुही लग्न करून टाक. स्नेहल अवाक होवून तिच्या कडे पाहत राहते.स्नेहल ला वाटत ती गेली होती तेव्हा सगळ ठीक होत परत आलो तेव्हा सगळं रूप पालटलं आहे.

या कथेत निरजांच अस कौतुक की त्यांच्या बऱ्याच कथा स्त्रिंवर कश्या प्रकारे अन्याय होतो यांवर आहेत पण  एकाकी सूर्य वितळताना ही कथा जरा वेगळी आहे.या कथेत एका पालकाकडून मुलांवर कसा अन्याय होतो हे दिसून येत. ओल हरवलेली माती या कथा संग्रहात नीरजांनी प्रत्येक कथेत मार्मिकपणे मांडणी केली हे दिसून येतं.

**-ओंकार फंड**

**तृतीय वर्ष कलाशाखा**

# कादंबरी- शाळा

मिलिंद बोकील लिखित शाळा कादंबरी - मिलिंद यांनी लिहिलेली कादंबरी साधारण: इ. स.१९७५ साली इयत्ता नववीत शिकणाऱ्या, पौंगडावस्थेतल्या शाळकरी मित्राच्या आयुष्यात एका वर्षात घडलेल्या घटनांभोवती ही संपूर्ण कांदबरी आहे .तसेच कादंबरीमधील मुख्य पात्र मुकुंद जोशी यांच्या शाळेत , आजूबाजूला व चाळीत घडणाऱ्या गोष्टी आहेत. इ.स. १९७५ साली भारतात लागू झालेला आणीबाणीचे देखील संदर्भ येतात.

कांदबरीमध्ये मुकुंद यांच्या शाळेतील बालपणाच्या गोष्टी मांडल्या आहेत.मुकुंद हा सुखदेव नामदेव वव्हाडकर हायस्कूल मध्ये इयत्ता नववीत शिकणारा विद्यार्थी आहे . त्यांचे चार मित्र म्हणजेच सुऱ्या, चित्र्या, फावड्या असे चौघे मित्र सुऱ्याच्या वडिलांनी बांधलेल्या बिल्डिंगवर जमून येणाऱ्या - जाणाऱ्या मूला - मुलींची लपून अश्लील भाषेत टिंगल करणे . शिक्षकावर कमेंट करणे . उरलेला गृहपाठ एकमेंकाच्या मदतीने पूर्ण करणे इत्यादी गोष्टी करतात. या वयामध्ये मुलांच्या मनात शाळेतील मुलीविषयी आकर्षण असणे . आपल्याला आवडत्या त्या मुलींच आपल्याकडे लक्ष जावं यासाठी निरनिराळ्या गोष्टी करणे . शिक्षकांना टोपणनावे ठेवणे . मुलींना चिडवणे शाळा भरल्यानंतर शाळेतील मोजके आवडते शिक्षक न आवडणारे शिक्षक . कोणीही डाऊट खाऊ नये अशा दिशेने मुलींकडे बघणे मुलांचे लोंगिक प्रश्न विचित्र कोंमेंट्स, अश्लिल गाणी गाणे,वर्गातून ऑफ तासाला पळून जाणे त्याची शिक्षा भोगणे आप्पाचा म्हणजेच प्रिंसिपलचा मार खाणे . मुलींना लाईन देणे . ह्या सर्व शाळेत केलेल्या गोष्टी  मिलिंद बोकील यांनी फार बिनधास्तपणे व अगदी खरी मांडणी केली आहे.

मुकुंदच्या बहिणी ला त्याच्यात चाळीत राहणाऱ्या विजयाबद्दल वाटणारे आकर्षण, आंबेकर ही शाळेत नवीन आलेला मुलींच्या प्रेमात पडणे,मुकुंदला अगदी जिवलग मित्रासारखा वाटणारा त्याचा नरूमामा,नरूमामा आणि याचे घट्ट मैत्रिचे नाते, महेश व सुकडीचे प्रेमप्रकरण , चित्र्या व त्याचा भाऊ राजू

यांना सांभाळायला चित्र्याच्या आईनी ठेवलेली देवकी नावाची अश्लील चाळे करणारी बाई . इत्यादी पात्र मुकुंद यांच्या जीवनाशी कांदबरीच्या मध्याशी स्पर्श करून जातात .

मुकुंदला आवडणारी शिरोडकर तिच्याविषयी सगळ्या मित्रांपासून मुकुंद लपून ठेवतो . शिरोडकर वर अत्यंत प्रेम करणारा, तिच्यासाठी सर्व गोष्टी केल्या, आपल्यावर कोणीही डाऊट खाऊ नये म्हणून पर्यंत केले, शेवटी नववीचा निकाल लागतो . शिरोडकरच्या वडिलांची बदली होते . आणि ती गाव सोडून गेल्याच कळते नववीच्या शेवटच्या दिवसात तिची भेट न होणे, व आधीच्या काही गोष्टींचा गैरसमज दूर न करता आल्यांचे दुःख ला वाटत होते. त्याच्या सोबतीचे मित्र नापास झाल्याने चित्र्याचे कुटुंब बांद्रयाला राहयला जाणार होते . अश्या बऱ्याच गोष्टी समजतात आणि आधीचे सर्व हवे असणारे दिवस संपून दहावीच्या प्रवेशाच्या वाटेला मुंकुदची सुरवात होते .

ही कांदबरी शाळेत गेलेल्या सर्वांसाठी अपर्ण केली आहे . ही कांदबरी वाचताना खरोखर आपण सुद्धा आपल्या शाळेच्या आठवणीत रमून जातो . आणि संपूर्ण शाळेतील जीवनाचा सफर करून आल्यासारखे वाटते . कांदबरी वाचताना मला माझ्या शाळेची फार आठवण आली. आपण सुद्धा अशीच केलेली मस्ती, शिक्षकांना त्रास देणे, टोपणनावे ठेवणे, मारामार्या करणे, ऑफ तासाला मस्ती करणे, वर्गाच्या बाहेर पळून जाणे, स्पोर्ट डे ला केलेली धमाल ह्या सगळ्या शाळेतील आठवणी जाग्या होतात . काही चांगलाही गोष्टी शाळेत केल्या शिक्षकांनी दिलेली शाबासकी ही तेवढीच मान उंच करून जाते . आपणही असेच वागलो आपल्या शालेय जीवनातील  आठवणी जाग्या होतात . अगदी आमच्याच शाळेतील प्रसंग या कांदबरीमध्ये लिहले आहेत याचा भास होतो . आणि पुन्हा लहान होऊन शाळेत जाऊन बसावसे वाटत. आणि पुन्हा तिचं मस्ती,मज्जा अनुभवाशी वाटते..

**-अनुष्का देशमुख**

**तृतीय वर्ष कलाशाखा**

# किरवंत - नाटक

किरवंत म्हणजे - स्मशानकर्मे करणारा ब्राह्मण

प्रेमानंद गज्वी लिखित किरवंत हे नाटक स्मशानकर्मे करणाऱ्या एका कुटुंबाच्या जीवनाविषयी असल्याचे आपल्याला दिसून येते.

या कुटुंबाला समाजात असलेले स्थान त्यांचा किरवंत असल्यामुळे सतत करण्यात येणारा अपमान, त्यांना दिलेली तुच्छतेची वागणूक, त्यांच्या पासून ठेवलेले दूर अंतर,समाजाने त्यांच्या वर लादलेली बंधने इत्यादी सगळया गोष्टीची मांडणी या नाटकात करण्यात आली आहे.

वडिलांपासून चालत आलेला किरवंतपणा पुढे त्यांच्या मुलांना देखील ह्याच धर्माचा वसा पुढे चालवावा लागला. आणि समाजाकडून देखील त्यांना हाच वसा तुम्ही पुढे चालवला पाहिजे असा असलेला हट्ट. असे न करणे म्हणजे प्रत्यक्षात स्वतःचा धर्म बुडवणे होय असे समजले जाईल.

सिद्धेश्वराने उचललेला किरवंताचा वसा वासुदेवाला काही मान्य नव्हता.

त्यांच्या होणारा सततचा अपमान हा त्याला अमान्य होता. आपण ह्या किरवंतपणातुन बाहेर पडण्यासाठी किरवंत मुलीशी लग्न न करता उच्च ब्राह्मण मुलीशी लग्न केले तर आपल्याला हा किरवंतपणाचा वसा पुढे नेता नाही येणार. पण तो हे विसरत होता की त्याचेच नाव त्याच्या मुलांना लागेल. किरवंताचा मुलगा असच त्याला बोलले जाईल.

आपण करत असलेलं काम वडिलांपासून चालत असल्यामुळे सिद्धेश्वर ते अपमान सहन करून देखील करत असतो. आपण आपला धर्म पाळला पाहिजे असा त्याचा एक वेगळाच समज असतो. तर वासुदेव ला वाटत होत की त्याच्या मोठया भावाचा तसेच त्याच्या कुटुंबातील कुणीच अपमान सहन न करावा. त्यामुळे तो ' सर्व हिंदू एक ' या संघात देखील जात असतो.

या नाटकामध्ये सिद्धेश्वरचा असलेला लहान मुलगा ह्याचा देखील प्रत्येक वेळेस अपमान करण्यात येत आहे. त्याचा बालमनावर ह्या सगळ्याचा काय परिणाम होईल ह्याचा समाजाने एकदा ही विचार केलेला नाही.

सिद्धेश्वराच्या बायकोची इच्छा असते आपण हे गाव सोडून दूर कुठे तरी शहरात जाऊन राहू. रोजचा होणारा हा अपमान तिला सहन होत नसतो. तसेच तिची होणारी सततची घुसमट

कोणामध्येच मिसळता न येणं. ह्या सगळ्या गोष्टी तिला असाह्य झाल्या होत्या. पण त्याच्याकडे किरवंतपणा सोडून देणे हा पर्याय नव्हता.

म्हणून ती देखील मनमारून व अपमान सहन करत आपला संसार चालवत होती.

वासुदेव आणि रेवती ची इच्छा असते की मधुने खूप शिकावे नोकरी करावी. त्या मुळे ते त्याला रोज शाळेत पाठवत असत.

तर वासुदेवाला समजलेला असतं की आपल्या सन्मानाची लढाई आपल्याला च करावी लागते. दुसऱ्याच्या हातात शस्त्र देऊन ती लढाई नाही लढता येत. याची जाणीव वासुदेव ला झालेली असते.

सुरवातीपासून असलेला बंडखोर वृत्तीचा वासुदेव आपल्याला वाटत की काही सुधारणा करून दाखवेल अशी समज आपण करून घेतो. पण शेवटला झालेला सिद्धेश्वरा चा मृत्यू या मुळे नाटकाला मिळालेली एक वेगळी काळाटणी. त्यानंतर किरवंतपणाचा वसा मधूला पुढे चालवावाच लागतो.

कोणत्याही सुधारणेची सुरुवात करून ती लगेच सुधारत नाही तर त्या दिशेने पाऊल उचलणे महत्वाचे ठरते. तशी भूमिका लेखकाने आपल्याला वासुदेव या पात्राच्या मार्फत दाखवून दिली आहे.

किरवंत ह्या विशिष्ट गटाला उचलायला लागलेला किरवंत पणाचा वसा आणि मग समाजाची असलेली त्यांच्याशी वागणूक ह्या सगळ्या गोष्टीचा शोध घेऊन ' किरवंत ' हे नाटक आपल्या समोर मांडण्यात आलेलं आहे.ब्राह्मण वर्गातील ह्या गटाचा देखील सगळ्यांना परिचय व्हावा. त्यांचे दुःख देखील इतरांना समजला पाहिजे ह्या दृष्टीने ह्या नाटकाची मांडणी आहे.हिंदू धर्मामध्ये ब्राह्मण हा उच्च धर्म वर्ग मानला जातो. पण त्या वर्गात देखील ब्राह्मणांच्या च एका गटाला दलितांसारख वागवल जात. ह्याची ओळख ' किरवंत ' या नाटकामधून आपल्याला ' प्रेमानंद गज्वी ' यांनी करून दिली.

**- ऋतुजा बेंद्रे**

**तृतीवर्ष कला शाखा**

## सिझर कर म्हणतेय माती:-कवितासंग्रह.

## कवयित्री:-कल्पना दुधाळ.

## कविता:-झलक':-मधला बांध.

(झलक):-आजच्या काळाशी जोडले गेलेले तंत्रज्ञान यांसारख्या वस्तूंशी निगडीत असलेले संदर्भ आणि त्यांच्या आहारी गेलेली युवा पिढी या सर्वांचे वर्णन, कवयित्री कल्पना दुधाळ यांनी या कवितेत मांडले आहे.

' कल्पना दुधाळ'यांच्या झलक या कवितेतील पहिल्या ओळीत असे संबोधले आहे, की जेव्हापासून हे जग तंत्रज्ञानाने भरलेला आहे, जसं की टीव्ही चॅनेल्स सारख्या वस्तु आजकाल प्रत्येकाच्या घरोघरी दिसून येत आहेत, शहराकडे, गावाकडे, प्रत्येकाच्या घरोघरी टीव्ही सारख्या मोबाईल सारख्या वस्तू दिसून येतात, घरात खायला अन्न मिळेना, पण पडद्यावर लागलेल्या रेखाटन यांना आपण खूपच प्राधान्य देतो, आजच्या पिढीने ही कसली नवीन थेर बागळलीत, पोटातल्या कावळ्यांना खायला अन्न नाही, तरी कुणी लहानग नाही, मोठ्या नाही, सगळ्यांनी त्या पडद्यासमोर गर्दी केलेली आहे., आजूबाजूला जाणाऱ्या येणाऱ्या लोकांकडे लक्षही नाही इतके माणसाचे माणूसपण विसरून आपण त्या तंत्रज्ञान याच्या आहारी गेलो आहोत. असे पहिल्या ओळीत मांडण्याचा प्रयत्न केला आहे.,

दुसऱ्या संदर्भात असे दिसून येते की 24तास स्क्रीन ठेवणारी क्रीम घेण्यासाठी पोरगी दिवसभर मजुरी करते, म्हणजे बघा युवा पिढी,या पडद्यांमुळे, टीव्हीमध्ये दिसणाऱ्या सुंदर नट्यांचे प्रमाणे, या शेतात काम करणाऱ्या मुलीलाही सुंदर दिसायची आवड निर्माण झालेली आहे, पोटाला खायला अन्न देखील नाही, पोटाची खळगी तरी कशी, तर ती या विचाराने त्रस्त होत नाहीये, आपल्यालाही टीव्ही मधल्या सुंदर नट्यांचे प्रमाणे सुंदर दिसायचे आहे यासाठी शेतात राबत आहे, दिवसभर मरमर करून जीव तोडून काम करत आहे, आपणच जर या तंत्रज्ञानाच्या इतके आहारी गेलो तर, आपल्या मागून येणाऱ्या पिढीकडून अपेक्षा करणं चुकीचं आहे, या तंत्रज्ञानामुळे जर आपण स्वतः बाहेर पडलो नाही तर हे असेच चालू राहणार, पोटाला खायला अन्न भाकर मिळाली नाही तरी बेहत्तर, पण तोंडाला लावायला क्रीम मात्र

हवी, चिमटा काढून आपण आपला चेहरा सुंदर ठेवू शकत नाही, त्यासाठी कष्ट हे करावेच लागणार, असे या दुसऱ्या ओळीतून दिसून येते.,

गोधडी च्या तुकड्यात होऊन पडलेली म्हातारी तिला नागिन हा आजार झाला आहे. तिच्या कमरेला नागिनी ने वेढा घातलेला आहे, आणि त्या जखमेवर माशा घोंगावत बसलेल्या आहेत, तरीही त्या म्हातारीकडे कोणी लक्ष देईना, जखमेमुळे पूर्णपणे विळखतून गेली होती म्हातारी, तरी कोणाचं तिच्याकडे लक्ष जात नाहीये, कोणाला हाक मारली तरी कोणी व देना, तरी ती आजची पिढी टीव्ही वर लागलेल्या चॅनेलची माहिती बघण्यात, चित्र बघण्यात, त्यांचे डोळे टिकून गेले आहेत, तरी या बघा ती म्हातारी हात देत आहे, तरीही कोणाचे लक्ष तिच्याकडे जाईना, म्हणजे बघा माणसाची माणुसकी कोणत्या थराला गेली आहे, आपण या तंत्रज्ञानामुळे इतके अडकलो आहोत की, आजच्या पिढीला त्यातून बाहेर पडणं सुद्धा मुश्किल झाले आहे, असे कल्पना दुधाळ यांनी या तिसऱ्या ओळीत सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.,

चौथ्या ओळीत असे दाखवण्यात आले आहे की शेवटचा श्वास जात असताना सुद्धा म्हातारी पाहण्यासाठी हाक देत आहे, कोणीतरी या आणि शेवटचं पाणी तरी पाजा, या म्हातारीचा जीव चाललेला आहे, अंधुक चार खांदे तरी कोणी झेला, आगीले बोलवत आहेत, वर जाण्यासाठी, म्हातारी तरीही घोटभर पाण्यासाठी तळमळते, पण त्या टीव्ही वर लागलेल्या मॅच मुळे कोणाला त्यातून बाहेर पडणं जमतच नाहीये सर्व त्या मॅच मध्ये असे गुंतून गेले आहेत की, तिथे पाणी मागत असलेल्या म्हातारीकडे कोणी बघत सुद्धा नाहीये, खरतर त्या मॅचचा आपल्याला काहीच फायदा होत नाही तरीही त्यात सर्व डुंबून गेले आहेत,आपल्या मनाचं मनोरंजन करण्याच्या नादात आपण आपल्या आजूबाजूला पडलेल्या माणसांना सुद्धा पाहू शकत नाही आहोत, म्हातारी खोळंबली आहे पाण्याच्या एका थेंबासाठी तरीही कोणीही उठून तिला घोटभर पाणी पण देईना, म्हणजे काय ही पिढी कसलेही वेळ म्हणायचे कसला छंद अंगी जोपासला आहे, या युवा पिढीला यातून बाहेर पडणं गरजेचा आहे, परिस्थितीला सामोरे जाऊन कष्ट करणे अनिवार्य आहे, तंत्रज्ञानामुळे डोकं भ्रमिष्ट होण्याखेरीज आणखी काही नाही देऊ शकत हे तंत्रज्ञान आपणास, हे आज कालच्या युवा पिढीला समजून घेणं अत्यंत महत्त्वाचं आहे, असे या ओळीत स्पष्टपणे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.,

'कल्पना दुधाळ' यांनी 'सिझर कर म्हणते माती' या कवितासंग्रहात 'झलक'या कवितेद्वारे या जगातली आज कालची एक झलक लोकांसमोर प्रस्तुत केलेली आहे, या तंत्रज्ञानाच्या जगात आपण

इतके हरवून गेलेलो आहोत की, माणुसकी जपणं काय असतं हेच आपण विसरून गेलो लोकांचे हाल होत असतानाही, पण त्या मोबाईल सारख्या फेसबुक व्हाट्सअप, सारख्या जगात अडकून पडलो आहोत, बाजूला असणारी माणसंही आपल्याला दिसेनाशी झाली अशी आज कालची परिस्थिती आहे, या सगळयातून बाहेर पडणं गरजेच आहे, नाहीतर या तंत्रज्ञानाच्या जगात माणूस पण विसरून आपणास नको त्या गोष्टींना सामोरं जाव लागेल, आपल्या मागून येणाऱ्या पिढीला आपण चांगला संदेश देऊ हीच शिकवण तंत्रज्ञानामुळे होणारे चांगले-वाईट बदल पुढच्या पिढीसमोर आपण ठेवू शकतो, या कवितेतून कवयित्री 'कल्पना दुधाळ'यांनी सांगण्याचा प्रयत्न केला आहे......!

**- सेजल थोरवडे , ३१४.**

**तृतीय वर्ष कला शाखा**

## कथासंग्रह:  ओल हरवलेली माती.

## कथा: रत्नप्रभा जाधव वर्तमानपत्रातील बातमी होते तेव्हा.

या कथेमधे सुरुवातीला   रत्नप्रभा सवयी सांगितले आहेत. रत्नप्रभा रोज पाच वाजून 40 मिनिटांचा गजर लावते आणि साडेपाच उठल्याबरोबर ती आंथरुणातच एक नमस्कार करते . आणि मग रात्री तांब्याचा तांब्या भरून ठेवलेले जवळ जवळ एक लिटर पाणी पिते. यामुळे सारा इडापिडा आणि    आजार अशी तिची श्रद्धा  आहे रत्नप्रभा कडे गॅसही आहे सुरक्षिततेच्या बाबतीत आणि सारे आजार दूर ठेवता येतात अशी तिची श्रद्धा आहे मग ती सवयीने स्टॉप पेटवते रत्नप्रभा लागे सही आहे पण पाणी तापवण्यासाठी तो वापरत नाही वस्तू मोजून मापून हिशोबाने वापरा वापरले पाहिजे तिच्या जास्त काळ आहे म्हणूनच गॅस वापरताना ती शक्य दोन महिने पुरेल याची ते काळजी घेते ती सुरक्षिततेच्या बाबतीत ही तशी सजग आहे म्हणजे उदाहरणार्थ काम नसेल तर ती गॅसचा नोट बंद करून ठेवते वर्तमानपत्रातून येणाऱ्या सिलेंडरच्या एकाचा मृत्यू वगैरे सारख्या बातम्यातील अजिबात अस्वस्थ करत नाहीत स्टॉप पेटवल्यावर रत्नप्रभा पाण्याने भरलेले बाहेरून आपले रूम आणि आकार हरवलेले जर्मन चे पुराण भांडे त्यावर चढते हे भाडे रत्नप्रभा रात्रीच धरून ठेवते रत्नप्रभा कामाचे नियोजन व्यवस्थित करायला आवडते. त्यामुळे वेळ वाचतो आणि कामे पटापट होतात असे ती नेहमीच सर्वांना सांगते.

कित्येक वर्षाचा पाणी तापवण्याचा कार्यक्रम रत्नप्रभा ने कधीही चुकवला नाही. रत्नप्रभा आयुष्यात फारसे बदल आवडत नाही.सरळ नाकासमोर चालणाऱ्या माणसातली ती एक आहे. त्यामुळे आजूबाजूला भयानक वेगाने घेणाऱ्या बदला ती सलग टाळू शकते. एवढ्या वर्षात विशिष्ट वन रूम किचन फ्लॅट मध्ये आल्यावरही रत्नप्रभा ने म्हणूनच आजही न्हाणीघरात गिझर लावून घेतले नाही. डीजेच्या उपकारांची तिला ऍलर्जी आहे त्यामुळे गिझर, इस्तरी, मिक्सर, फ्रिज, वॉशिंग मशीन अशा उपकार आन पासून ती आजही तशीच दूर राहते. टीव्ही मात्र तिने अगदी नाईलाजाने घेतला आहे कारण कंटाळवाण्या आयुष्यात रंगीत करण्याचा एकच मार्ग सध्यातरी तिच्यापुढे आहे. रत्नप्रभा ने दोन भावंडांची जबाबदारी घेतली आहे. तिने पाणी स्टोअर अस गरम करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. ती सकाळी उठल्यावर तिचा महत्त्वाचा कार्यक्रम मशेरी भाजण्याचा आज कॉल गेट क्लोज अप च्या वगैरेच्या जमान्यातही रत्नप्रभा तंबाखूची मशेरी भावते. मीनाक्षी जाधव रत्नप्रभा ची धाकटी बहीण शेंडेफळ. ती कॉलेजमध्ये शिकते आहे खरंतर मीनाक्षी म्हणजे रत्नप्रभा ची धाकटी बहीण बारावीनंतर रोग

नोकरी करण्याची इच्छा होती. खरं तर मी ना खरंतर तिच्या भावंडांना खूप शिकवायचे स्वप्न असते आपले अर्धवट राहिलेले स्वप्न त्यांनी पूर्ण करावीत अशी तिची इच्छा असते ती त्या दोघांना सतत प्रोत्साहित करत असते शिक्षण हाच प्रगतीचा मार्ग आहे हा मुजिक हा बुजुर्गांनी सांगितलेलं सुविचार तिच्या मनावर कोरला गेलेला असतो. म्हणूनच मीनाक्षीने आपल्यासारखेच शिपाई न होता रत्नप्रभा ते स्वप्न असते की तिने ऑफिस मधल्या हेड ऑफिस मध्ये किंवा सीनियर इन्स्पेक्टर म्हणून मोठे व्हावे असे तिला नेहमीच वाटत असते. मीनाक्षी ला याची खात्री आहे की ती तिची बहीण रत्नप्रभा त्यांच्यापेक्षा चांगली दिसते. रत्नप्रभा एक साधी गावठी दोन वेण्या घालणारी बाई असते. मीनाक्षी कॉलेजला जात असते. प्रभात रत्नप्रभा च्या पाठीवर लाडका भाऊ गौतम जाधव. तीन वेळा फेल झाल्यावर पुन्हा एकदा टी वाय बी ए ला बसण्याचा मानस असलेला गौतम जाधव रत्नप्रभा चा लाडका भाऊ. रत्नप्रभा ला त्याच्या कडून खूप अपेक्षा असतात पण मीनाक्षी कडून तिला असे कळते की तू खूप वेगळ्या लोकांमध्ये असतो. त्याला क्रांती गर्म हवा आणि श्याम बेनेगल यांचे सामाजिक प्रश्नांवर चे सिनेमा पाहायला खूप आवडते. तो मार्क्स बापाची पुस्तक आहे वाचत राहतो. रत्नप्रभा ने लग्न केल्यामुळे व तिला मूलबाळ नसल्याने तिला गौतम जाधव म्हणजे तिचा भाऊ ती त्याच्या पासून त्रास असला तरीही ती काही करू शकत नव्हती व ती ते सहन करत होती. कारण आपल्या म्हातारपणाचा तो एकच सहारा होता.

रत्नप्रभा ऑफिसमध्ये काहीच घडत नाही घडले तरी त्याचा परिणाम रत्नप्रभा च्या आयुष्यावर होत नाही.  रत्नप्रभा तिचा दिवस केवळ टेबलावरच्या फाईल त्या टेबलावर पोचवण्यात घालवते. मीनाक्षी जाधव रत्नप्रभा ची धाकटी बहीण वर्गात बसायला आवडत नाही. रंगीबिरंगी कपड्यात फिरणाऱ्या फुलपाखरे तिला जास्त मोहक वाटतात मग ती उगीचच वहीवर चित्र काढत राहते. शक्य तेवढे एकमेकांच्या जवळ आणण्याचा प्रयत्न ती करते शेवटी ती एकमेकांच्या इतके जवळ जाणारे मालिकाच तयार होते आणि शेवटी ती एकमेकांच्या इतके जवळ येतात की बेंचवर बसलेल्या मीनाक्षीच्या शरीरावर रक्तप्रवाह अपघात होण्या एवढ्या वेगाने धावू लागतो .

ज्या इमारतीत रत्नप्रभा राहते तिथे सर्वात जास्त आवडणारे कुटुंब म्हणजे कुलकर्णी यांचे! इतर कुटुंबियांच्या तुलनेने या कुटुंबांची तिचे जिव्हाळ्याचे संबंध होते आणि त्याचा तिला अभिमानही आहे. स्वतः कुलकर्णी त्यांची पत्नी मुलगा सून आणि त्यांचा छोटासा नातू सारी नियमित सुखात असतात. त्या सर्वांना असे आनंदात आयुष्य घालवताना पाहून रत्नप्रभा ला वाटते माणसाने जगावे तर असे स्वताला तसे जगता येईल नसेल तरी कुलकर्ण्यांच्या सुखात जगण्याचा आनंद रत्नप्रभा लुटते. रत्नप्रभा ला

कुलकर्णी आवडतात म्हणून त्यांचे बापूही. रत्नप्रभा जाधव यांचा भाऊ गौतम सहज सांगतो तर तो चिडतो आणि तिला स्पष्ट सांगतो की मी बापूंना नाही तर फुले-आंबेडकर बुद्ध मार्क्स यांनाही मानतो .

रत्नप्रभा ला आपल्या मेणचट आयुष्याचा कंटाळा आला आहे त्यामुळेच ती आनंद शोधा शोध घेण्याचा सतत प्रयत्न करत असते अगदी मशेरी लावण्यापासून स्वयंपाक करण्यापर्यंत प्रत्येक गोष्टीत हा आनंद मिळायला हवा असे तिने स्वताला बजावून सांगितले आहे. स्वप्नात सुरू झालेला हा वास्तवाचा शोध रत्नप्रभा ला दमतो कधीकधी स्पष्ट होत जाणाऱ्या चेहऱ्यांमध्ये मग तिला कुलकर्णी यांचा मुलगा कुजबुजत असल्यासारखे वाटते कधी ऑफिस मधला हेड लोक तिच्या अंगावर बसून असताना दिसतो. तिची कासाविशी वाढत जाते या गर्दीत पण शोध मात्र थांबत नाही सकाळी उठल्यावर तिला लघवीची प्रचंड कळ येते. तिला उगीच अपराधी वाटत राहते हे असे आपल्याला होता कामा नये अशी स्वप्न तर आपण पाहताच कामा नये असे ती स्वतःला वारंवार बजावते आणि मग वस्त्रगाळ मशेरी ने तंद्री लोक पर्यंत खसाखसा दात घासत राहते.

कदाचित या समस्यांवर बापूंकडे उपाय असावा म्हणून रत्नप्रभा कुलकर्ण्यांच्या सुनेला आपली समस्या सांगून बापूंना उपाय उपाय विचारायला सांगते पण कुलकर्णी यांच्या सुनेकडे उपाय असतो ती म्हणजे ' उशीर झाला खूप, पण लग्न करून टाका." रत्नप्रभा या उत्तराने चकितच होते. बापूंना न विचारता प्रथमच कुलकर्णी यांच्या घरातल्या व्यक्तीने उत्तर दिले ला पाहून तिला ग्रेट वाटायला लागतं. कुलकर्णी कुटुंब कधीतरी पापुं शिवाय मजा करायला बाहेर जाते मग रत्नप्रभा फारच एकाकी होऊन जाते. आरती नंतर मिळणारा साजूक तुपाचा शिरा चा प्रसाद रत्नप्रभा आवडीने खाते.

आंबेडकरांच्या पुतळयाची वितंबना केली म्हणून उसळलेल्या दंगलीत गौतमाने घेतल्याने त्याची रवानगी तुरुंगात झाली. इतर पुरुषान सारखेच शर्ट पॅन्ट मध्ये मोकळेढाकळे मिशाळ बापू एकदम आवडले रत्नप्रभा ला, शेवटी बापूंना साकडे घालावे असे कुलकर्णी यांनी सुचवल्या वर रत्नप्रभा प्रथमच बापूंच्या दरबारात पोचली. आपल्यापेक्षा लहान लहान कोवळ्या मुलांना कॉलेजमध्ये पाहून अखेर मीनाक्षीने कॉलेज सोडले. आता ती खिडकीत उभे राहून नाक्यावर उभे असलेल्या मुलांकडे पाहत राहते. रत्नप्रभा ला तिच्या स्वप्नात अथवा लग्नातही तसा रस नाही आता आपले वय होत चालले असल्याने आणि सोबत इथला डायबिटीस सही असल्याने मीनाक्षीने आपल्याला सांभाळावे असे रत्नप्रभा ला वाटते. मीनाक्षी मार्गी लागली तर व्ही. आर.एस घालायचा तिचा विचार आहे.

रत्नप्रभाला वाटते गौतम बरोबर मीनाक्षी गेली तर आपल्याला कोण पाहिल? मीनाक्षीने आता पस्तीशी ओलांडली ओलांडले तिचा रंग काळा होत चालला आहे कोरड्या त्वचेला सन स्क्रीन लोशन लावूनही ती सिल्क होत नसल्याने आणि फेअर अँड लव्हली उजळत नसल्याने नाक्यावर ची मुले आता तिच्याकडे पाहीन आशी झाली आहे. आजही रत्नप्रभा ने प्रयत्न करायला हवेत असे तिला आग्रहाने वाटत असते. मीनाक्षी ला रत्नप्रभा नकोशी झालीये. राजनीति तिला सहन करते. आपल्या दुःखाचे कारण रत्नप्रभा असल्याची तिची खात्री असल्याने अधून मधून ती ही शिव्या देण्याचा कार्यक्रम पार पाडते. गौतम आता पूर्णपणे भाई माय झाला आहे. त्यात मार्स आंबेडकरही दुःखी मनाने उभे दिसतात. त्याला ही पुस्तके पाहायला ही वेळ नाही. कुलकर्णी बापूंच्या कृपेने मोठ्या घरात गेलेला आहे. रत्नप्रभा ला त्यांचा आनंद जाणून घ्यायचा आहे, मीनाक्षी ला ही. म्हणूनच ते दोघेही दिवसभर दार उघडे ठेवुन जोडीने बसून राहतात. रत्नप्रभा ला त्यांच्याशी शेजारधर्म वाढवायचा आहे. पण ते सुरुवाती करायला मागत नाही. तरीही रत्नप्रभा चिकाटीने त्या क्षणांची वाट पाहत बसून राहते.

रत्नप्रभा तंबाखूची मशेरी करत नाही. मीनाक्षीने आणलेली नवीन क्लोज अप वापरते. निवृत्ती झाल्यावरही ती 5 :40 गजर लावून उठते. ती रोज पाहिजेत यास सरदारा खालील जाहिरात पाहते. स्वप्नातला राजकुमार येत नाही म्हणून स्वतः राजकुमाराच्या शोधात जाण्याचा तिचा मानस आहे. गौतम चा आणि रत्नप्रभा चा संबंध आता संपल्यात जमा आहे. भिंती निर्विकारपणे उभ्या आहेत रत्नप्रभा च्या दृष्टीने मीनाक्षी मेली आहे. तिचे तेरावे करणे शक्य नसेल तरी रत्नप्रभा ने तेरा दिवस मीनाक्षीच्या फोटो पुढे दिवा तेवत ठेवला. रात्री बारा वाजता ही तिचे दार उघडे असते. एकूण रत्नप्रभा चा दिन कर्म दिवसेंदिवस दिन वाना होत चाललेला आहे. कुलकर्णी यांना रत्नप्रभा चे फार वाईट वाटते. बापूंनी तिच्यासाठी काहीतरी करावे असे त्यांना फार वाटते. बापू रत्नप्रभा साठी काहीच करू शकत नाही. खरंतर बापूंना सारे शक्य आहे. रत्नप्रभा ला वाटते आपण आयुष्यात काहीच मिळवले नाही. गमवले ही फारसं नाही. या आयुष्याकडे त्रयस्थपणे पाहता पाहता तिला अनेक गोष्टी कळून चुकले आहेत.

घडले घडलेल्या या आयुष्याकडून तिचे आता काहीच अपेक्षा उरलेली नाही. आपण असाच तटस्थपणे विचार केला तर आपल्याला बापूंसारख्या दिव्यदृष्टी लाभेल याची तिला खात्री वाटू लागली आहे. शहरातल्या प्रत्येक भिंतीवर तिच्या भयानक पण स्वप्ने दाखवणाऱ्या चेहऱ्याची लागली आहेत. अगदी नावाजलेल्या वर्तमानपत्रांनीही तिच्या फोटोसकट तिच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी तिला अर्ध पान बहाल केलेल्या पाहून तर ती स्वप्नातल्या स्वप्नात खुश झाली आहे. आयुष्यात भव्यदिव्य काहीतरी करणाऱ्या माणसांचा फोटो त्यांच्या मृत्यूनंतर पेपरात येतोच मग ज्यांनी काही म्हणजे काहीही केले नाही

अशा व्यक्तींचाही फोटो पेपरात यायलाच हवा असे तिला ठामपणे वाटते. त्यासाठी आता काहीतरी करायला हवे असा निश्चय रत्नप्रभा ने केला आहे. ती आता माऊथ वॉश करते दिवसातून जेवढा वेळा करता येईल तेवढा वेळा तीतो आठवणीने करते. त्यामुळे मनात चांगले विचार येऊ आपल्याला वाणीला धार येऊन आपण अखंड चांगलेच बोलत राहू अशी तिला आशा वाटते. जमिनीवर थेट पंख्याखाली आडवी पडून ती पंख्याकडे पाहात राहते. जमिनीवर थेट पंख्याखाली आडवी पाहून ती पंख्याकडे पाहात राहते पंख्याच्या गतीने आपले विचार करायला हवेत असे तिला स्वतःला बजावले आहे. रत्नप्रभा अगदी लहान असताना म्हणजे आई-बाबा असतानाच काळात वडाच्या झाडाला बांधलेल्या झोपा झोपाळयावर घेतलेले झोके आठवतात. आता पुन्हा झुल्यावर झुलायचे दिवस आले आपले या विचारांचे ती आनंदून जाते. सकाळी दूधवाला येतो तेव्हा ती दार उघडत नाही, पेपरवाला आल्यावरही उघडत नाही. शेजार धर्म खेळवत ठेवल्या ठेवण्यासाठी ती दार उघडत नाही. तेही अनाथ आठ सारखे पडून राहिल्यावर येथेच्छ झोके घेऊन घेऊन थकलेले रत्नप्रभा लोकांच्या नजरेतून थेट वर्तमानपत्रात तिसऱ्या पानावर पोहोचते. रत्नप्रभा च्या झोक्याची फोटो सेट बातमी झालेली असते. कुलकर्णी बातमी वाचून आश्चर्यचकित होतात. सारेच प्रश्न अनुत्तरीत ठेवून रत्नप्रभा गेली. ती अशा तऱ्हेने जावी अशी परिस्थिती निर्माण करणाऱ्या लोकांमध्ये अथवा परिस्थितीबद्दल ही कोणत्याही कटू ला मनात न ठेवता रत्नप्रभा गेली. रत्नप्रभा च्या मृत्यूचा दाखला येऊन पडला आहे. त्याचा उपयोग आता कोणाला होईल? गौतम की मीनाक्षी? रत्नप्रभा ची आत्महत्या होती की सहज मृत्यू? कुलकर्णी प्रश्नांनी हैराण झालेत. बापू मुळे आनंदात चाललेले आयुष्य रत्नप्रभा मुळे विस्कटून गेल्यामुळे हा भयाला समोरे कसे जायचे याचा विचार करत कुलकर्णी पंख्याकडे पाहात बसून राहतात. त्यांना पेपरची बातमी होण्यास अजिबात रस नाही. तरीही कुलकर्णी पंख्याकडे पाहात का बसून राहतात हा सर्वांनाच प्रश्न पडलाय. त्याचे उत्तर बापूंना ही मिळत नाही.

या कथेमधून आपल्याला समजते कसे गौतम आणि मीनाक्षी दुरुपयोग करतात. मीनाक्षी आणि गौतम ने केलेल्या कामामुळे रत्नप्रभा रत्नप्रभा आत्महत्या करायला मजबूर होते. रत्नप्रभा खूप स्वप्न बघते गौतम व मीनाक्षी बद्दल पण त्याच्या मधलं काहीच पूर्ण होत नाही.
काही प्रश्न खरेच अनुरीत असतात रत्नप्रभा च्या आयुष्यात सारखे!

**- वृषाली भोर**

**तृतीय वर्ष कला शाखा**

## कवितासंग्रह :- सीझर कर म्हणते माती

## कविता :- बाप

## कवयित्री :- कल्पना दुधाळ

बाप :- आठवणींचा प्रवास, कष्टांचा प्रवास, बाप-मुलगी मधलं नात या सगळया प्रवासामधले संदर्भ , आठवणी आणि अचानक पणे बाप सोडून गेल्यावर जाणवलेला एकटेपणाची व त्याच्या कष्टाची जाणीव या सर्वांचे वर्णन कवयित्री "कल्पना दुधाळ" यांनी "बाप" या कवितेत मांडले आहे.

"कल्पना दुधाळ" यांच्या बाप या कवितेतील पहिल्या ओळीत त्यांनी असे म्हटले आहे की, भोळा - भाबडा बाप माझा माळयावर शेळया सोडायचा. छकाठीने बांधावरच्या बोरी - बाभळी झाडायचा. जेव्हा लांबलचक पांढुरक्या शेंगा छुमछुम पडायच्या तेव्हा धामोक घोळवत शेळया कुडूकुडू शेंगा फोडायच्या. शेतात बाप माझा रात्रंदिवस राबायचा , कष्ट करायचा, जे आपण सहन करतो ते आपली मुल-बाळ सहन करू नये म्हणून तो रक्ताच पाणी करायचा. बापाची मेहनत, कष्ट, जिद्द, चिकाटी या सगळयाचे वर्णन पहिल्या संदर्भात मांडले आहे.

दुसऱ्या ओळीत असे म्हटले आहे की, जेव्हा शेतात कष्ट करून झाल्यावर प्रचंड भूक लागायची तेव्हा बाप करडं - कोवळी पान खायचा, ओढ्याच पाणी प्यायचा .भर तापत्या उन्हात स्वतःच्या खोपटातली चूल पेटवायचा. जिथे आपण जेवायचे, तोच शेतकरी बाप जेवायचा वेळेस थाळीभर गुळाच्या चहात आपल्या पोटाची आग मिटवायचा.आज आपण दोन वेळ जेवतो, पोट भरतो, पण ज्याच्या मुळे आज आपण सुखाने पोट भरू शकतो, पण ह्याच शेतकरी बापाची उपासमार होत आहे. तोच आज आपल पोट भरू शकत नाही. आपल्या कुटुंबाच्या आयुष्य भराच्या जेवणाची चिंता करतो तोच असतो बाप हेच दुसऱ्या संदर्भात कवयित्री ने पटवून दिले आहे

तिसऱ्या ओळीत असे सांगितले आहे की ,असेच कष्ट करत बाप एकटा निघून गेला. बाप अडाणी होता पण त्याची स्वप्न मोठी होती आयुष्यात काही झाले तरी डगमगायचे नाही, मेहनतीची, ईमानदारीची कास कधी सोडायची नाही. फक्त आयुष्यात चुकीच्या मार्गाला नाही जायचे काहीही झाले तरी तो चांगले संस्कार माझ्यावर करून गेला.आयुष्यात काहीतरी बनायचं स्वप्न मनात पेरून गेला. अचानक पणे शेळया मागे अनवाणी फिरत असलेला बाप अदृश्य होत गेला .पावसाळ्यातल्या ओढ्यागत घळाघळा

वाहत राहिला बाप. वडिलांच्या घमोली सर्व काही वाटे अपूर्ण आहे. वेळ निघून गेल्यावर कळते की वडीलांचे महत्व हेच  तिसऱ्या संदर्भात दिसून येते

चौथ्या संदर्भात कवयित्री असे संबोधले आहे की ,बापाच्या पायाला जखमा होऊन सुद्धा तो इतका काट्या - कुट्यातून कष्ट करत फिरत आहे.अर्थातच, बाप कष्ट करायचं, अचानकपणे एकटा निघून गेला. त्यात एकटेपणा असल्याची जाणीव होते.बापाच्या कष्टाने मुलगी अस्वस्थ झाली.आजही कठीण परिस्थिती / प्रश्न सामोरे आले असता ,.मन एक विचार असेही करते की या परिस्थितीत वडील कसे सामोरे गेले? आपण कसे जातो ? काय चुकले का आपले?असे अनेक प्रश्न विचार मनात सतत उमटत राहतात

कल्पना दुधाळ यांनी सिजर कर म्हणते माती या कवितासंग्रहात  "बाप" या कविते द्वारे त्यांनी वडीलाच महत्व पटवून दिले आहे. बाप नावाची चादर जेव्हा आयुष्यातून निघून जाते तेव्हा प्रत्येक सकाळ ही जबाबदारी ची जाणीव करून देते. परिस्थिती अत्यंत विरोधी व क्रुर असेल तर तिच्याशी तिच्या ही पेक्षा क्रुर होऊन सामोरे जावे आणि कष्ट करून मेहनतीने, चांगल्या मार्गावर जाऊन आपण पोट भरन यासाठी खंबीर मन वडिलांकडून त्याच्या कष्टातून मिळाले.कल्पना दुधाळ यांनी हेच सांगायचे प्रयत्न "बाप" या कवितेतून केला आहे.....

**- दिव्या विकास करगुटकर**

**तृतीय वर्ष कला शाखा**

## कथा-मित्राची गोष्ट

या कथेची सुरुवातच जोसेफ बद्दल सुरू होते ही माझी गोष्ट नाही माझ्या मित्राची आहे कदाचित असेल किंवा आमच्च्यापैकी कुणा एकाची आणखी कुणाचीही जोसेफ अब्राह्मण भारतातल्या एका छोट्याशा गावातून तो आला होता जोसेफ अंद्र्यूज जर होता मी पण ब्रदर होतो मी ग्रॅज्युएशन करत होतो आणि जोसेफ एकही ग्रॅज्युएशन करत होतोत्याचं आम्ही चालत होतं दोघांनीही लिटरेचर होतं

मग जोसेफ विली ला भेटायला आला होता जोसेफ आला त्या दिवशी खुप फिरवलं आदिवासी पाड्यात आम्ही खूप फिरलो व्हॅली ऑफ कोणत्या कोणत्या माणसात राहतो नेमकं काय काम करतोय सगळं सांगितलं जोसेफला मग जोसेफ म्हणाला मला लोकांपासून दूर जाता येईल का मग विली म्हणाला जवळच्याच देवळात किंवा चर्चमध्ये जायचं तर तो म्हणाला नको देवापासून कुठेतरी मोकळ्या वर बसू

मग दुसऱ्या दिवशी दोघही एक_दोन किलोमीटर असलेल्या धरणावर गेलो अगदी जोसेफला हवी तशी सुनसान जागा इथे आल्यावर जी सुख मिळाले ते आपल्याला नको असतं का मग मी बोलतो ते तर त्या त्या प्रत्येकाला हव  असतं पण हे नाकारण्याचा व्रत घेतला आहे आपण हे वत् ! हे व्रतच आड येतं प्रत्येक वेळी जोसेफ सुस्कारत म्हणाला.

मग विली जोसेफला विचारतो तुला एवढ्या तातडीने का भेटायचं होतं मला जोसेफ मग जोसेफने विल इकडे पाहिला आणि हसला खळखळून तुला आठवण तरी झाली मी का आलो आहे म्हणून इकडे बोलतो मी तुला सुजाता बद्दल बोललो होतो ना मग मी बोलतो होतीस ना तुझ्या संस्थेत मानसोपचार तज्ञ म्हणून काम करणारी सुजाता सुजाता तिचे आई वडील गेले तर त्याने तुझं काय जोसेफ

जोसेफ आणि सुजाताचा एकमेकांवर खुप प्रेम होतं ते दोघं लग्नही करणार होते पण तिचं एकदा घटस्पोट झालं आणि तीचे घरचे फार पारंपारिक आहे आमची फार छान मैत्री झाली होतीजोसेफ म्हणतो त्या संस्थेत असं माझ्या विचाराशी जुळणारी कोणीच नव्हतं सगळे फादर म्हणजे जुनी खोड न बदलणारी तोच विचार करणारी त्याच त्या प्रथा, रूढी धर्मांच्या व्याख्या सांगणारी ती बोलायची ती माणसांविषयी वेगवेगळ्या प्रकारच्या माणसांविषयी त्याच्या स्वभावाविषयी त्यांच्यातल्या संस्कृतीविषयी प्रकृतीविषयी आणि कधीकधी विकृती विषयी एकदा हे व्रत घेतले की मुखवटे घालून जगायचं परिस्थिती लागते हे आपल्यावर मग ती आर्थिक असो की सामाजि

आपल्या कॉलेजमध्ये एकदा फर्नांडिस जस्टिन तिच्या प्रेमात पडला होताजितक्या ठामपणे ब्रदर होण्याचा निर्णय घेतला होता त्यांनी तितक्याच ठामपणे हे सारं सोडण्याची ठरवलं होतं त्याने आणि आता लेक्चरर आहेत दोघेही आता खुश आहे त्यांचे दोन गोड मुली आहेत आणि मुख्य म्हणजे दोघेही काम करतात मेंटली रिटायर मुलांसाठी जसं जमेल तसं पण आनंदित आहेत दोघही कुठं काय वाईट झाले आहे फर्नांडिस नाव ही घ्यायचं नाही अशी ताकीद होती सगळ्या कॉलेजमध्ये आणि त्याच काळात आपल्या बद्दलही फादर स्टीफन कानावर गेलं होतं फादरने मी नाही सांगितलं होतं तुला जायचं असेल तर तुम्ही जाऊ शकतो कारण त्या काळात विनी सुद्धा माधुरीच्या प्रेमात पडला होता आणि आणि फादर किती वेळ बोलत होते याविषयी बद्दल फादर बोलत होते समाजाचे एवढे प्रश्न आहे तेवढे अज्ञान आहे दारिद्र आहे इथं आणि त्यांच्या साठी सारं आयुष्य वेचलं ची शपथ घेतली आहे तू माधुरीला विचारलं होतं तू पाकाची नाहीतर पुण्याची भागीदारी होशील का तू पण माधुरीला आपल्या पुण्यात रस नव्हता माधुरीला फक्त विलीन नावाचा शरीर एक नवऱ्याची भूमिका करणारा माणूस आणि सामोरे जावा त्या परिस्थितीला

मग जोसेफला दोन वर्षांसाठी रोमला ही जायचं होतं व्हॅटिकन  चर्चमध्ये राहायचं होतं आणि त्याला बिशपची जागा मिळणार होती आणि बिशपची जागा मिळाल्यावर सुजाता सोबत लग्न नाही करता येणार म्हणून विली कडे आला मग विली बोलतो मला विचारण्यापेक्षा सुजाता लाच विचार काय मार्ग काढायचा तो पण बोलतो मी याबद्दल फक्त तुझ्याशी बोललो तु कोणाला बोलू नकोस

विली बोलतो बिचारा जोसेफ

सुजाता की बिशप दोन्ही मिळणं अशक्य आहे

मग पिलीची पोस्टिंग त्या शहरात होती ज्या शहरात तिला माधुरी भेटली होती आणि त्याला माधुरी पसंत आली होती मग त्याला सगळ आठवलं माधुरीला नाकारून पंधरा सोळा वर्ष झाली तेच विद्यापीठ तीच इमारत आजही तशी

सुजाता सुजाता ने आठ दिवसाची मुदत ठेवली होती आठ दिवसात केव्हाही आलास तर मी तुझीच आहे नाहीतर मग परिस्थिती स्वीकारण्याची तयारी आहे माझी जोसेफ फ्रॉम ला गेला खरा पण मनाने सुजाता जवळच राहिला एकदा पत्र आलं होतं त्याचा पोप समोर प्रार्थना करता करता अचानक सुजाता ग्रासून टाकलं त्याला आतून-बाहेरून जोसेफ मी चेहऱ्यावर मुखवता घातला होता आतून तो फक्त सुजाताच होता तो फक्त फादर समोर उभा होता चेहऱ्यावर मुखवटा घालून आणि आतून त्याला असंही वाटत होतं

की आपल्या चेहऱ्यावर आपण आपल्या मनात जे चाललं आहे त्या फादरला कळलं तर आपल्याला विषयाची पदवी मिळणार नाही म्हणून त्याने लगेच चेहऱ्यावर मुखवटा घातला

मी पण त्या चर्च मध्ये गेलो तर मी सुद्धा चेहऱ्यावर मुखवटा घालून होतो सगळ्यांना दिवसभर दात दाखवत देवा विषयी काय काय सांगत होतो मी लोकांना उगीचच देव आपल्याबरोबर असतोच त्याला मनात वागवा त्याची आठवण ठेवा तो तुमची सोबत करील आणि हो तिलाही म्हणालो मी माधुरी ही त्या चर्चमध्ये आली होती त्याच्या छोट्या मुलाला घेऊन आणि त्यालाही मी ब्लेसेस दिली आता परत आला आहे आला आहे म्हणून मनातलं भय सुरक्षितपणे जपण्यात यशस्वी झालेला तो आता भविष्यात होणार आहे कालच आमंत्रण पत्रिका मिळाली त्याबरोबरच पत्रही जोसेफला वाटत होतं की सुजाता आपल्या सोबत असावी पण विला असं वाटत नव्हतं त्याला वाटलं की सुजाता जोसेफ समोर आली तर जोसेफ बिशप ची वस्त्र फेकून तो सुजाता कडे जाईल सांगता नाही येणार सोसे मनानं आणि शरीरानं ही गुंतला होता तिच्यात अजूनही तिला वजा करता येत नाही त्याला त्याच्या आयुष्यातून मी तर माधुरीला ठरवून नाकारलं होतं तरीही त्या दिवशी माझ्यासमोर मुलाला मांडीवर घेऊन बसलेल्या माधुरीचे नजरेला नजर कुठे देता आली मला तिची नजर त्या दिवशी मला क्रूसावर चढवून मोकळी झाली होती

वीलीने शहर सोडण्याचा निर्णय घेतला होता डोंगराळ भागात द्यायची तयारी दाखवली तो माझा शेवटचा दिवस होता त्या शहरात तिला कसं कळलं कोण जाणे पण ती भेटायला आली मी तिला विचारलं तिला कसं कळलं मी जाणार असल्याचा तर म्हणाली तुला सांगितलेल्या तुझ्याबद्दल अनेक गोष्टी माहित आहे मला माधुरीच्या मांडीवर जो बाळ होता तो आपलाच होता पण आपण हे सगळं नाकारलं आणि फादर रस्त्यावर आलो असं मला वाटलं पण मी रोज कल्पेश करतो की मी आजही माधुरी वर प्रेम करतो मी सगळं तिच्यासमोर बोलत होतो पण तिलाही माहिती होतं की मी सगळं खोटं बोललं बोलत होतो म्हणून माधुरी मिला बोलते तू इकडून जाऊ नकोस मी जाते इकडून मी माझ्या नवऱ्याला बोलेल की तू तुझी पोस्टिंग दुसरीकडे घे मग बोलतो तुझ्या नवऱ्याला आपल्याबद्दल सगळं माहिती आहे का तू एवढ्या त्याने बोलते तर तर ती बोलते हो मी सगळं सांगितलं होतं लग्नाच्या आधी मी काहीही लपवलं होतं आणि माझ्या नवऱ्याने सांगितलं की मला वीली ला भेटायचं आहे एकदा तरी बिली बोलतो कशासाठी मला भेटायचं आहे माधुरी बोलते तू काही प्रेक्षणीय वास्तू नाहीस त्याला अजून मी सांगितलं नाही आहे या चर्चमध्ये आलेला फादर विल्यम मेथी हा माझा विधी आहे आणि ते सांगणार नाही नाही दिल

वीलीला काहीच बोलता आलं नाही यांत्रिकपणे त्याने थँक्स सॉरी गॉड ब्लेस यु वगैरे म्हणाला म्हणालो गेली जाताना ओलावली नजर लपवली मग मग ती जाताना बोलली तू कोणत्याही शहरात गेलास तरी माधुरी दिसेल तुला शेवटच्या बाकावर बसलेली अजूनही दिसते मला रोज शेवटच्या बाकावर बसलेली मला दिसेल सुजाता अशी शेवटच्या बाकावर बसलेली गोष्टीचा शेवट आणखी वेगळा असेल कदाचित आपल्या पेक्षा चांगला जोसेफ आणि सुजाता एकत्र आलेली दिसते चर्चमध्ये माझ्यासमोर बसतील त्यांच्या रांगणारा बाळाला घेऊन आणि मी बिशप म्हणून त्यांच्यासाठी प्रार्थना करत असेल शेवट विषय प्रचंड उत्सुकता आहे मला हे सामान तयार करायचा आहे उद्या नवीन नव्या गोष्टी नव्या शेवटीचा ही सुरुवात होणार आहे

**- उमेरा शेख**

**तृतीय वर्ष कला शाखा**

# बेईमान

इडा पिडा टळो या कथा संग्रहातील आसाराम लोमटे लिखित बेइमान या कथेची थोडक्यात मांडणी.

कथेचं मुख्य पात्र भगीरथ आहे;ही कथा त्याच्या दैनंदिन  जीवनाच्या अवतीभवती फिरत असते. व तो पुढे जाऊन कोणती बेइमानी करतो आणि कोणा बरोबर करतो. हे पुढे तुम्ही जसजसं वाचत जाल तसतस ते उलगडत जाईल.

भगीरथ ने त्याच्या शेतात कापसाची आणि बी. टी. ची पेरणी केलेली असते.त्याच्या जवळचे पैसे बी-बियान घेतल्यामुळे संपत आलेले असतात. एक दिवस भगीरथ शेतात जातो.उन्हाळयातल्या सारखं कडक उन पडलेलं असतं सगळी जमीन तापलेली असते.सहज तो सरकी लावलेल्या जागेवर उकरून पाहतो तर सरकीला मुंग्या लागलेल्या असतात.त्याच भान उडालं तसाच तो गावात येतो.

रात्री भगीरथ ला झोप लागत नसते.तो बाजेवर पडल्या पडल्या आकाशाकडे एकटक बघत राहतो.पेरणी होऊन बरेच दिवस झालेलं तो आणि इतर गावकरी पाऊसाची वाट बघत असतात.भगीरथ ला वाटत सगळीकडून ढग यावे, गार वारं सुटावं आणि धो-धो पाऊस पडावा.त्याने बियानं जास्त घेतलेल असत म्हणून त्याला लोक टोमणेही.एका वर्षी ग्रामपंचायतीची निवडणूक असते.सरपंच पद ओबीसी साठी असत म्हणून भगीरथ निवडून येतो.खर तर भगीरथला राजकारणात काहिच रस नसतो.पण सदा काकाच्या आग्रहा खातर तो निवडणुकीत उभा राहतो आणि निवडून देखील येतो.सध्या त्याच लक्ष शेतातल्या पिकाकडे असते.कारण पेरणी करून भरपूर दिवस झालेले असतात पण पाऊस येण्याचा काही ठिकाणाच नसतो.भगीरथला दुबार पेरणी ची त्याला चिंता वाटू लागते.

पुढे भगीरथला सदाकाका सांगतो की दोनच्या वर मुल झालं की सरपंच पदावरून बरखास्त करून टाकतात.कोणाला कळल तर हातचं पद जाईल.आता भगीरथच्या मागे नवीनच भानगड लागल्या मुळे त्याला अजुनच ताण येतो. काका त्याला म्हणतो काहीतर कर आणि ही भानगड मिटव;नंतर काका त्याला म्हणतो मुल पाडून टाक. भगीरतला जास्तच चिंता वाटू लागते त्याला अस वाटत कुठून या सरपंचपदी आलो. राही भगीरथ ची पत्नी.भगीरथ घरी आल्यावर तो राहिला महत्त्वाचं काहीतरी बोलायचं आहे अस सांगतो.आणि राहिला बोलतो की आपण मुल पाडून टाकूया.राही चकित होते.ती म्हणते की मुल नको हा विचार आधी करायला पाहिजे होता.आता पाचवा महिना चालू झालाय आणि मी मुल पाडू देणार नाही.भगीरथ चारी बाजूने संकटात अडकलेला असतो. तो घरातून बाहेर पडतो त्याला

वाटेत त्याचा लहानपणीचा मित्र श्रीधर भेटतो.भगीरथ आणि श्रीधर यांचे शेत बाजू बाजूलाच असते.ते दोघे वाटेने गप्पा मारत असतात तेव्हा श्रीधर कडून त्याला कळत की पाटलाची माणसं भगीरथला पदा वरून काढायच्या मागे लागलेत.

तो रानात पडल्या-पडल्या विचार करु लागतो.कि दोन मुलीं नंतर आता मुलगा व्हावा अस दोघांचं बोलनं किती वेळा झालेले. राहीने तर नवस केलेला असतो.तो विचार करत झोपी जातो. सांजवेळेला तो उठून घरी जातो.घरी त्याची सासू आलेली असते.राही त्याला सांगते दिंडीत जाण्यासाठी तिची आई आलेली असते.भगीरथ चहा पिऊन सदाकाका कडे जातो.तो राही ऐकत नाही अस सांगतो.सदाकाका म्हणतो उशीर व्हायच्या आत कर; लांबचा दवाखाना गाठ आणि हो मोकळा जवळपास काही करू नको.भगीरथच्या जिवाला नुस्ता घोर लागलेला.भगीरथला अस वाटत की गावातली सर्व लोक त्याला वेगळ्या नजरेने बघतात. सर्वजण त्याच्या बद्दलच विचार करतायत.

भगीरथ घरी जातो तेव्हा त्याचे वडील त्याची वाट बघत बसलेले असतात.ते त्याला ओरडतात की पदासाठी मूल पडायला निघालास.हे समजल्यावर राही सुद्धा त्याला रागाने बोलते. सगळीकडून भगीरथचा कोंडमारा होत असतो.त्याला राग येतो व तो राहिला जोरात कानाखाली लगावतो.त्याबरोबर त्याचे वडील दरवाजा बंद करून घेतात आणि भगीरथ ला पकडतात. राही चवताळते माझा जीव घ्या अस म्हणते.भगीरथ ला आणखी राग येतो आणि तो तिच्या कंबरेत लात घालतो.तो तिला म्हणतो जास्त तोंड चालवल तर आजुन मारेन.म्हातारा त्याचे वडील त्याला वरडतो दोन जीवांची बाई तुला कळत नाही... गरोदर बाईला मारतोयस... माणूस आहे की हैवान.भगीरथला आठवत की त्याने राहीवर पहिल्यांदाच हात उचलला.त्याच्यातली सर्व ताकतच निघून जाते. जरावेळाने सासू घरी आल्यावर भगीरथ घरा बाहेर पडतो व तालुक्याला जातो.तेथे त्याला श्रीधर भेटतो.ते चहा घेत बोलू लागतात.श्रीधर म्हणतो तिसऱ्या मुलाचं काय करायचं ठरवलंय मग तो त्याला सांगतो आज त्या विषया वरून घरात भांडणं झालं.श्रीधर त्याला म्हणतो बायकोला जरा वेगळ्या पद्धतीने समजव;आणि श्रीधर त्याला सांगतो की राहिला अस सांग मुलगा असेल तर ठेवू मुलगी असेल तर पाडून टाकू;दोन मुली आहेत तिसरी मुलगी असेल तर पाडू हे सांगून तिला दवाखान्यात ने अस सांगितल तर राही तुला नाही बोलणार नाही.श्रीधर सांगतो की चांगल्या दवाखान्यात तिला ने इथल्या दवाखान्यात बरोबर उपचार करत नाही श्रीधरने सांगितलेली कल्पना त्याला चांगली वाटते.घरी जावून हेच सर्व राहिला सांगतो. व ते तिला पटत.तो तिला तयार राहिला सांगतो. भगीरथ सदकाका कडे जातो आणि उसने पैसे घेतो.

दुसऱ्या दिवशी भगीरथ म्हाताऱ्याला पटवतो की तो राहिला दवाखान्यात घेवून चाललाय मुलगी असेल तर गर्भ पाडू आणि मुलगा असेल तर नाही. राही तयार होते आणि दोघेही घरून निघतात.भगीरथ पुढे चालत असतो राही त्याच्या मागे.वाटेने सर्व गावकरी राहीच्या पोटाकडेच पाहत असतात.भगीरथला थोडी भीती वाटू लागते.ते एस.टी रुग्णालयात जातात.तो राहिला पुन्हा समजावतो काही काळजी करू नको सगळं ठीक होईल.भगीरथ तिला बसवतो व डॉक्टरकडे जातो आणि त्यांना सांगतो की गर्भ पाडायचा आहे मुलगा असो की मुलगी.बायकोला यातलं काही कळू देवू नका अशी विनंती करतो.पण बायकोला सांगा की मुलगी आहे. डॉक्टर गर्भ पडायला तयार होतात.राहिला एका खोलीत नेतात व तिची तपासणी करतात.तपासणी करून झाल्यावर राहिला सांगतात की मुलगी आहे. राहीच त्राण जात,तिला खूप हवालदिल झाल्या सारखं वाटतं.भगीरथ राहिला सांगतो आता हे तुझ ऑपरेशन करतील मी तुला लागणाऱ्या गोळ्या घेवून येतो. व भगीरथ बाहेर जातो,तो खूप अस्वस्थ होतो.त्याला खूप वाईट वाटतं. राहिने कधी त्याच्या कडे हट्ट केले नाहीत का अधिकची मागणी केलेली नसते आहे त्यातच ती खुश असते.इकडे राहिला डॉक्टर इंजेक्शन देतात राहिला पोटात खूप वेदना होतात. वेदनेने ती तलमळू लागते..... मुठी घट्ट आवळते.....पाय आपटते.....ती खूप जोरात किंचाळते तिला वेदना असह्य होतात व रक्ताच्या चिळकांड्या सोबत  गर्भ बाहेर पडतो.बेडवर सर्व रक्त होत.नर्स तिची साडी बदलून तिला दुसऱ्या बेडवर ठेवतात.ती आता शांत झालेली असते.ती आता मेल्या सारखी पडून राहते.

नर्स भगीरथ ला सांगते की मुलगा असतो.भगीरथला कोणी उंचावरून खाली ढकल्या सारख होत.आता त्याच्या विषयी कोणी काड्या करणार नव्हतं. त्याच पद जाणार नव्हत.पण त्याने राहीला विश्वासात घेतलेले;आणि खोट बोलून इथवर आणलेल.त्याने तिला सांगितल आणि ती लगेच तयार झाली. राहीचा त्याच्यावर पूर्ण विश्वास होता.दोघांचं लहानपणी लग्न झालेले असत.राही त्याला प्रत्येक कामात मदत करायची.आठव्या महिन्या पर्यंत ती शेतात काम करायची.दुसऱ्या बायका थोड्या-थोड्या वरून भांडतात.पण राही तशी नव्हती.ती त्याला समजून घ्यायची.सावली सारखी त्याच्याबरोबर असायची.भगीरथने तिचा विश्वास घात केला त्याने तिच्या बरोबर बेइमानी केली.त्याला आता अपराध्या सारख वाटू लागत.त्याला रडू येवू लागत;पण आता डोळे पुसणे देखील त्याला बेइमानी वाटू लागते.

**- ओंकार  फंड, ३०४**

**तृतीय वर्ष कलाशाखा**

# जाता नाही जात - नाटक

प्रा. सिद्धार्थ तांबे लिखित ' जाता नाही जात ' हे नाटक एकंदरीत आपल्याला जात या विषयावर आहे. हे समजून येत. जातीचा कशाप्रकारे राजकारण करण्यात आलेले आहे. हे या नाटकातून आपल्या पर्यंतर सहज पोहचते.

नाटकाच्या शिर्षका बद्दल बोलायचं झालं तर -' जाता नाही जात '

हे या नाटकाला शिर्षक देण्यात आले आहे. ह्यातून हेच कळते की - जात आपल्याला कश्याप्रकारे चिकटून बसलेली आहे. ज्या प्रकाने एखादा आजार काही केल्या जात नाही. त्याचप्रकारे जात ही आपल्या समाज व्यवस्थेला वर्षानुवर्षे चिकटून बसलेली आहे. कितीही प्रयत्न केला तरी ती एखाद्या जुनाट आजारा सारखी आपल्या सोबत आजून देखील आहे.

जात ही जन्मापासून आपल्याला कशा प्रकारे चिकटून बसलेले आहे. तित्यातच आपण कशाप्रकारे गुरफटून बसलेलो आहोत. याचे दर्शन देखील आपल्याला या नाटकातून घडून येते.

ओरिएंटेशन कोर्सला विविध ठिकाणा वरून आलेले प्राध्यापकनंतर ओळख करून घेताना समजलेली एकमेकांची जात.त्या नंतर त्यांच्यात होत गेलेले गट हे आपल्याला दिसून येते.

सगळे प्राध्यापक आप -आपला ओरिएंटेशन चा कोर्स पूर्ण करायला आलेले असताना. एकमेकांना समजून घेऊन एकत्र राहणे हे न करता. त्यांनी वसतिगृहात जातीचा बाजारच मांडलेला दिसतो. आप - आपले वेगळे गट करून जो तो तुम्ही काय केलात आणि आम्ही काय करत आहोत. या भोवतीच गुरफटून राहतात.

सगळे प्राध्यापक असून देखील जातीयवाद मानतात. हा नाटकातील महत्वाचा मुद्दा आहे.

प्राध्यापक म्हणजे उद्याच्या पिढीचे भवितव्य घडवणारा एक महत्वाचा घटक असतो. प्राध्यापक म्हटलं की एक समजूतदार पणा तसेच समज असलेली व्यक्ती आपण डोळ्यांसमोर आणतो. पण हेच प्राध्यापक जर जातीयवाद मानत असतील तर येणाऱ्या पिढीचे भविष्य ते काय घडवतील हा प्रश्न या नाटकातून आपल्या समोर उभा राहतो.

पात्रांच्या बाबतीत बोलायचं झालं तर पगारे हे पात्र आपल्याला नेहमी झोपलेले दाखवण्यात आले आहे. हे पात्र आपल्याला आंबेडकर वादी दाखवण्यात आले आहे. तसेच पगारे हे पात्र समाजातील जी माणसं स्वतःच असं वेगळं मत मांडत नाहीत

जातीय वादात गुरफाटून पडलेली आहेत. म्हणजेच स्वतःचा डोकं न लावता दुसऱ्याच्या विचाराने चालणारी माणसे ह्या लोकांचे प्रतिनिधित्व करताना आपल्याला दिसत आहे. सुरवातीला आल्यापासून पगारे कांबळे ह्याच्या सोबत मैत्री करण्याचा प्रयत्न करतात. कारण त्यांना ते आपले जात वाले असल्यामुळे त्याची सोबत करून घ्यायची असते. पण कांबळे यांना त्याच सततच जयभिम जयभिम बोलणं आवडत नसत. तर शरद पाटील हे पात्र या नाटकातील राजकारणी आणि अत्यंत लबाड अश्या प्रकारे दाखवण्यात आलेल आहे. पगारे शी गोड बोलून त्याची खाट त्याने बलकावून घेतलेली असते. त्याच्या त्यांनी वापर करून घेतलेला असतो असे आपल्याला दिसून येते. तसेच त्याला स्वतःचा प्रोजेक्ट देखील लिहायला दिलेला असतो. शेवटला पगारे यांना शरद पाटील ह्याचा खरं रूप समजतच.शरद पाटील ह्याची लबाडी पाहता त्यांनी गुंडूराव आणि शेख सर ह्यांच्या बॅगांची अदलाबदल करतात.आणि त्यांच्यात भांडणे लावुन देतात.

इतर नाटकातील पात्र हिंदुत्ववाद मानणारे, देव धर्म मानणारे पात्र आहेत. वसतिगृहावर पूजा चालू करण्यासाठी त्यांनी वसतिगृहात शांतता राहावी, मन प्रसन्न राहावं अशी कारणे देऊन देवपूजा चालू केली. पण त्यांना शेख सरांच नमाज पढणे त्यांना मान्य नव्हता.

वासतिगृहात वाद निर्माण होण्यासाठी पगारे नी लपवून ठेवलेला डॉ.आंबेडकरांचा फोटो भिंतीवर लावण्या बाबत पगारे सरांना

शरद पाटील त्यांना सुचवतात. मग भिंतीवर फोटो लावुन त्याचा आनंद साजरा करण्यासाठी पार्टी करतात. आधी सुरवात ते दोघेच करत मग बाकी सगळे प्राध्यापक येऊन त्याच्यात मिसळतात.

पण कोणालाच माहित नसते पार्टी कशा बद्दल देण्यात आली आहे. नंतर त्यांचा लक्ष भिंतीवरील फोटोकडे जाते. मग सगळ्यांना समजत आणि कांबळे सरांना ह्या गोष्टीचा राग येतो. ते पगारे वर भडकतात. या फोटो लावण्यावरून मग वसतिगृहात पुढील सगळ्या घडामोडी घडतात.

वसतिगृहात होत असलेल्या बाकीच्या गैरसोयी कडे सगळ्यांनी लक्ष द्यावे या साठी 15 दिवसांनी कांबळे सरांनी मीटिंग बोलावलेली असते.पण मीटिंग चा विषय भरकटत जाऊन तो जातीयवादा कडे जातो. मग कांबळे सर कशाप्रकारे त्यांची जात मार्क्सच्या मागे लपवण्याचा प्रयत्न करत आहेत. हा मुद्दा शरद पाटील सगळ्यांच्या समोर मांडतात.हा विषय बदलण्यासाठी खोपकर सर सांगतात की तुमच्या या वांझ चर्चेपेक्षा देवळात जाऊन टाळ कुटणे हे केव्हाही चांगल असं ते सांगतात.

मग त्यांना साथ देत जोशी सर म्हणतात आपण मीटिंग चा समारोप गणपतीच्या आरतीने करूया.याचा विरोध करत कांबळे सर म्हणतात तुम्ही देव देव करून धर्माचा देखील बाजारच मांडला

आहे. काय दिलं तुम्हाला देवाने असं प्रश्न त्यांनी सगळ्यांना विचारला. ह्या वर जोशी म्हणतात ह्यांना आमचेच देव बरे दिसतात. आमच्या धार्मिकतेची थट्टा यापुढे सहन केली जाणार नाही. आणि धमकी दिल्यासारखा बोलतात की पुढच्या 15 दिवसात आम्ही काय करू ते दाखवूच तुम्हाला आणि मग गुरुजींना बोलावून धर्म सभा बोलावली जाते. धर्म सभेत सगळे रोबो सारख्या हालचाली करतात. आणि गुंडुरावांना मांडीत सुरा देखील खुपसायला सांगितले जाते. धर्म सभेत गुंडूरावांचा वापर करून घेण्यात येतो.

धर्म सभेत कोण कोणत्या गोष्टी घडत आहेत हे जाणून घेण्यासाठी कांबळे सर खोपकर सरांना विचारायचा प्रयत्न करतात. पण काही हाती लागत नाही.मग ते गुंडूरावांन कडून माहिती काढतात. नाटकाच्या शेवटच्या भागात पगारे ला कांबळे सर उठवतात आणि त्यांच्या शी चर्चा करायला सुरवात करतात. कांबळे सर त्यांना खरा आंबेडकर वाद समजावून सांगतात. आणि पगारे ना डॉ. आंबेडकर यांचे विचार नव्याने समजले. देव धर्मातून बाहेर पडण्या साठी पगारे सरांना कडून साई बाबांचा गंडा देखील फेकायला लावतात.कांबळे सर आपले विचार सगळ्यांनाच नाही पटवून देऊ शकले पण निदान पगारे सरांना ते समजाऊ शकले. त्या नंतर गुंडू रावांची लेखी कोणी तरी कंप्लेट केलेली असते. ही बातमी सगळ्यांना कळते. सगळ्यांचा संशय कांबळे सरांकडेच जातो.

त्यांची बॅग, आणि कॅमेरा वगैरे तपासायला मागतात. पण शरद पाटील म्हणतात जाऊदे. आणि बॅग नाही तपासली जात.

ह्या गोष्टीचा बदला घेण्यासाठी मग बाकीची मंडळी वसतिगृहावर रात्री मोठ मोठयाने आरती बोलायला चालू करतात.शेवटचे 2 दिवस उरलेले असतात फक्त कोर्स चे त्यामुळे पगारे सर शरद पाटील ह्यांचा

प्रोजेक्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असतात. पण ह्या सगळ्या गोंधळा मुळे कोणालाच काही सुचत नसतं. थांबवायला सांगितला असता. तुम्ही बाहेत लायब्ररी मध्ये जा असे त्यांना सांगितले गेले. शरद पाटील आल्यावर त्यांना पगारे हे सगळं थांबवायला सांगतात. पण ते देखील त्यांच्यात सामील होतात.

मग शरद पाटील ह्यांचा खरा रूप पगारे ह्यांच्या पुढे येते. त्यांनी दुसऱ्याला ही त्यांचा प्रोजेक्ट लिहायला दिलेला असतो.

मग पगारे ह्यांना वाटत ह्या सगळ्या गोष्टी फोटो लावण्यापासूनच सुरु झाल्या होत्या म्हणून ते तो फोटो काढतात. आणि कोणीही त्या फोटोला हात लावायचा नाही असे सांगतात.

तर कांबळे सर त्यांना सांगतात की किती दिवस अश्या फोटोच्या ढाली करून जगणार. आणि मग ते सगळ्यांना सांगतात की त्यांनीच रेकॉर्डिंग आणि तक्रार ही केली होती. आपण इथे 1 महिना राहून नक्की काय केले ह्या बद्दल ही ते बोलले. धर्माच्या नशेत सगळे स्वतःला कश्या प्रकारे विसरून गेले आहेत. एका फोटो लावण्याच्या प्रकरणा वरून कश्या प्रकारे वसतिगृहातिल वातावरण बदलत गेले. आणि मग पुढे सगळ्या घटना घडल्या.

शेवटचे फक्त 2 दिवस उरलेले आहेत. ते तरी आपण आनंदाने घालवूया असे कांबळे सर सगळ्यांना सांगत असतात.

गुंडुरावांना त्यांचा बोलणं पटत. आपला बाप देखील आपल्याला अश्याच समजुतीच्या गोष्टी सांगायचं असं त्यांनी कांबळे सरांना सांगितला.कांबळे सरांचे विचार गुंडुरावांना पटले तरी शेवटी ते त्यांना विचारता तच की कांबळे सर तुमची जात कोणती हो ?

गुंडू राव सगळ्यातून बाहेर पडून त्यांचा बोलणं तर त्यांना पटत पण त्यांच्या डोक्यात असलेली जातीची कीड काही शांत बसत नाही. त्या मुळे ते विचारतात तुमची जात कोणती ? ह्यातून इतकंच समजत की आपल्या कडे कितीही समजून घेण्याची

ताकद असली तरी आपल्या समाज व्यवथेला जातीने पोखरले असल्या मुळे आपले विचार त्या पली कडे जात नाहीत.

प्रा. सिद्धार्थ तांबे यांनी या सगळ्या गोष्टींची मांडणी त्यांच्या जाता नाही जात ह्या नाटकातून आपल्या पर्यंतर पोहचवली आहे.

आपण आजून ही कश्या प्रकारे जातीयवादात अडकून पडलो आहोत. आणि पुन्हा पुन्हा त्यातच कसे गुरफाटून राहिलो आहोत हे नाटक वाचताना आपल्याला समजते.

**- ऋतुजा  बेंद्रे.**

**तृतीय वर्ष कलाशाखा**

# प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप

## लेखक:-प्रा. ह. श्री. शेणोलीकर

ज्ञानेश्वरांचे चरित्र आणि, कार्य:-प्राचीन मराठी वाङ्मयात लेखक 'प्रा. ह. श्री.शेणोलीकर' यांनी ज्ञानेश्वरांचे चरित्र आणि कार्य मांडले आहे, ज्ञानेश्वर यांचे चरित्र सर्वपरिचित आहे,त्यांचा जन्म शके1993 किंवा 1997 मध्ये झाला असे दोन मत मांडले आहेत, ज्ञानेश्वरांनी हयात पंचवीस वर्षांची (जन्म इ.स सन १२७१ व समाधी इ.स. १२९६) साली घेतली.त्यांचा जीवनात त्यांनी अनेक कार्य केले, संन्यासोत्तर काळात गृहस्थाश्रम

स्वीकारण्याच्या पापाबद्दल ज्ञानेश्वरांच्या मातापित्यांनी प्रयोगक्षेत्रीजाऊन देहत्यागाचे प्रायश्चित्त केले,पैठण होऊन तिघा भावंडासह परत येताना वाटेत, नेवासे येथे नानेश्वरांनी {ज्ञानदेवी,इ.स.१२०९ व अमृतानुभव हे दोन ग्रंथ लिहिले.} चांगदेवानसारख्या योग्याचा गर्वहरण करून नामदेव वारकरी संतान बरोबर ज्ञानेश्वरांनी उत्तरेकडची तीर्थयात्रा केली, तीर्थयात्रेचा शेवट पंढरी वरून परतल्यावर ज्ञानेश्वर इ.स.१२९६ मध्ये आळंदीत समाधिस्थ झाले, एवढ्या अल्पयुष्यात महाराष्ट्र संस्कृतीचा पाया भरण्याचे महाकार्य ज्ञानेश्वरांनी केले, संन्यासाची मुले म्हणून वर्णाश्रम व्यवस्थेच्या चौकटी बाहेर या चार भावंडांना ठेवण्याचा हटवाद पैठणच्या पंडितांनी दाखवला, एखाद्या परिणाम जे त्यांनी आपल्या सहानुभूतीचा व प्रेमाचा ओघ अपेक्षित व वंचित अशा बहुजन समाजाकडे वळविला, त्यांच्या घराण्यात पुर्वापार चालू असलेल्या विठ्ठल भक्ती मुळे त्यांच्या मनावर विश्वबंधुत्वाचा व भूतदयेचा दृढ संस्कार झाला होता, आपल्यावरील होणाऱ्या अन्यायामुळे उच्चवर्णीयांवर चिट्टी न जाता त्यांनी आपल्या उज्वल चारित्र्याच्या रुपाने सहिष्णुतेचा व उदार याचा धडाच घालून दिला. गुरु परंपरेने न्यानेश्वर हे नाथपंथी होते, भाषेचे माध्यम हा त्यांचा नाथपंथीय वारसाच होय.

ज्ञानेश्वरांचे व्यक्तिमत्व:- या कार्याला साजेसे प्रभावी व्यक्तिमत्व न्यानेश्वर यांना लाभले होते,

ऋ◌ा◌ंतदेशी तत्वज्ञ, आत्मानुभव योगी,भूतदयावादी संत आणि प्रतिभासंपन्न कवी अशा,चतुर्विध भूमिकांनी ज्ञानेश्वरांचे व्यक्तिमत्व संपन्न झाले आहे, तत्वज्ञानाच्या बाबतीत नाथपंथी अद्वैत मत शाड़कर वेदांत व काश्मिरी शैवमत यांचा संस्कार ज्ञानेश्वरांच्या बुद्धीवर झालेला दिसतो तरी त्यांची विचारसरणी तशी स्वतंत्र आहे, असे मांडले आहे, तिच्या 18 अध्याय यांची विभागणी ही परंपरेला सोडून स्वतंत्रपणे केली आहे, अनेक हालअपेष्टा सोसून ज्ञानेश्वरांनी आतापर्यंत आपली कामगिरी चांगली पार पडली

आहे., उपनिषदीक तत्त्वज्ञानाच्या आधारे त्यांनी आपला जिद्दीला सवाद अमृतानुभव या स्वतंत्र ग्रंथात मांडला आहे आणि ज्ञानेश्वरीतही विशद केलेला आहे,आपल्या योग मार्गाचे रहस्य ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात विस्ताराने वर्णले आहे,विठ्ठलाच्या गन व युक्त भक्त प्रेमाची सगुण-साकार मूर्ती म्हणजे ज्ञानेश्वर होत, या भावनेत साऱ्या संत मंडळाने ज्ञानेश्वरांना माऊली'ही पदवी दिली, आपल्या जीवन काळात अनेक व्यक्तिमत्व साकारली आहेत असे दिसून येते.

ज्ञानेश्वरांची अमृतवाणी:-सर्वत्र दृष्टी इत्यादी गुणांनी संपन्न असे ज्ञानेश्वरांचे व्यक्तिमत्व होते गुरूभक्ती चा आणि कृष्ण अर्जुन प्रेमाचा विस्तार त्यांनी यात जिव्हाळ्याने केलेला आहे, त्यावरून त्यांच्या संत रूदयाची साक्ष पटते अमृतवाणी दिसून येते,

ज्ञानेश्वरांचे वांड़मय:-ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवापासष्टी, हरिपाठाचे व इतर अभंग आणि समाधी च्या वेळेस चे नवं प्रकरण इतकी ग्रंथरचना निर्विवादपणे ज्ञानेश्वरांची आहे, अभंगाच्या अर्वाचीन भाषेच्या मुद्द्यावर अभंग करते न्यानेश्वर व न्यानेश्वरी करते ज्ञानेश्वर व्यक्ती एक नसाव्यात असा एक वाद मध्यंतरी उपस्थित झाला होता. असे सांगण्यात आले आहे, भगवद्गीतेवरील सर्व टीका ग्रंथात विख्यात मी लोकप्रिय अशी टीका म्हणजे ज्ञानेश्वरांची ज्ञानदेव (इ.स.१२९०) होय. 9000 ओव्यांचा विस्तृत व्याख्यानात ज्ञानेश्वरांनी गीतेच्या ७०० लोकांचा आश्रय उपमा दृष्टांत याच्या आधारे सुलभ आणि सुरस करून सांगितला आहे, ज्ञानेश्वर अनुभूतीवादी संत आहेत.'माझ्या मराठीची बोलू कवतुके!परी अमृतातेही पैजा जिंके!!यांसारखी त्यांनी स्वतंत्र ग्रंथरचनेत प्रस्थापित केले.असे दिसून येते,गीतेचा आधारे ज्ञानेश्वरी मध्ये श्रीकृष्ण याचेहृदगत विषद करून, सांगितले नंतर त्यांनी अमृतानुभव हा स्वतंत्र ग्रंथ लिहिल.ज्ञानेश्वरांनी रेखाटलेली, कृष्णजनची देवभक्तिकृष्णचा भूमिकेशी झाली.म्हणूनच(भावार्थदीपिका)हे रूढ झालेले नावच सार्थक वाटते.

ज्ञानेश्वरांनी आपल्या आतापर्यंतचा कारकीर्दीत खूप हलापेश्ठा सोसून समाजासाठी कार्य केले,त्यांच्यासाठी जगले.,नेहमी चांगले कर्म करत राहून लोकांची मदत केली,त्यांना अनेक परिस्थिती मधून बाहेर काढले असे अनेक कार्य ज्ञानेश्वरांनी केलेले आहे,असे प्राचीन मराठी वाड;मयीन साहित्यात प्रा. ह.श्री.शेणोलीकर यांनी मांडले आहे.

**- सेजल थोरवडे**

**तृतीय वर्ष कलाशाखा.**

# प्रिय...

## कथासंग्रह - ओल हरवलेली माती

पॉप्युलर प्रकाशित लेखिका नीरजा द्वारे लिखित कथा प्रिय...

प्रिय कथा इतर सर्व कथा पेक्षा वेगळी ठरते कारण पात्राच्या संवादावरून ती कथा पत्रारुपी आहे, हे समजून येते. कथे मध्ये लिहिणार प्रिय कोण आहे हे नेमक कळत नाही. ज्याला लिहितो तो प्रिय आहे, की लिहिणारा प्रिय आहे. हे मात्र अजूनही कळत नाहीये. लिहिणारी व्यक्ती स्त्री असून ती आपल्या प्रियकराला पत्र लिहीत आहे. तिच्या पहिला पती निघून गेल्यावर तीने तिच्या प्रियकराशी जवळीक साधून पत्र लिहून संवाद साधते. हा प्रिय अखंड प्रेमात बुडालेला व्यसनी उत्तम कलाकार आहे. व्यसणात बुडालेल्या प्रियकराला बाहेर काढण्यासाठी ती त्याला व्यसनमुक्ती केंद्रात जायचं सल्ला देते. प्रियसीच मुलगा शिक्षणासाठी बाहेर गावी गेला आहे, आपल्या एकट्या पडलेल्या आईची जवाबदारी मात्र त्याल न आवडणाऱ्या व्यक्ती सोबत राहण्याचा पर्याय देतो.

बऱ्याच दिवसा नंतर लांब लचक पत्र त्यांनी (नवरा) लिहिले त्या पत्रात लग्न करून सोडून गेलेल्या बायकोमुळे रात्री-बेरात्री पडणारी स्वप्न मध्येच आलेली जाग! शरमेची चादर पांघरून तळमळणारा तो. ती मात्र हमखास प्रश्न विचारते, तू लग्न का करत नाहीस? वरून असाही सल्ला देते की, आपल्याकडं आई बापांनी बक्कळ प्रयत्न करूनही लग्न जमलेल्या मुलींची काही कमतरता नाही. पोरिनी केलेल्या नवसाला तुझ्या सारखा एखादा पावला तर समाजही ऋणात राहील तुझ्या अशी उद्देशून त्याला म्हणते. त्यात ह्या दोघांचा कॉमन मित्र श्रीरंग यांनी दोन मुलींची नाव सुद्धा सुचवली होती. त्यातली कोणती मुलगी पसंत असेल तर लग्न करून टाक, एवढ्या सहज बोलून गेली होती म्हणजे लग्न केलं असता तर त्याच्यासाठी ती मोकळी झाली असती. तिने स्वतःला एवढ्या सहज त्याच्यातून सोडवून घेतलं. तो मात्र अजूनही तिच्याच आठवणीत रमतो आहे शेवटी जात पुरुषाची मिळालेल्या वस्तूची अति वापर करणे नंतर हातातून निसटल्यावर पश्चाताप करून घेणे.

माझ्याकडे मनोहर अधून मधून येतो हे तुला कसं कळलं? की इथंही ही तुझे खबरे ठेवलेले आहेस? यावरून स्पष्ट दिसून येते की, नात्यामध्ये नसलेला विश्वास. तसही समाजात एखादी घटस्फोटित स्त्री, विधवा स्त्रिया, आपल्या नवऱ्या पासून कामानिमित्त लांब असणाऱ्या राहणाऱ्या अश्या बाईकडं असे अनेक जण खडा टाकायचा प्रयत्न करतात. असाच प्रयत्न माधव गेल्यानंतर त्यांनी सुद्धा त्यानी केला होता.

बाईच्या एकटेपणाचा त्रास तिला जेवढा होत नाही तेवढा या हलकट आणि नालायक समाजाला होत असतो.

पत्र रुपी का होईना काळजीपोटी प्रियसी तुझं मन दुसरा कशातही रमत नसेल, तर पुन्हा एकदा हातात ब्रश घे आणि रंगांच्या दुनियेत रमून जा. निदान ती कमीत कमी नको ती स्वप्न पडायची बंद होतील. आणि संशयाने अस्वस्थ झालेलं मन तरी ताब्यात राहील, असा सल्ला सुद्धा देते. तिने त्याला पत्र लिहिलं आणि श्रीरंग भेटला. त्याचं जहांगीर मध्ये प्रदर्शन असल्याचं सांगितलं. तिने सांगायच्या आधीच तो रंगाच्या दुनियेत परतला होता. तरीही तो मात्र अस्वस्थच. ती ज्या प्रमाणे शब्दाच्या सोबतीने राहते तसाच तू सुद्धा ह्या रंगाची सोबत मिळव.

त्याच्या प्रदर्शनाला यायला तिला नक्की आवडल असता, पण अनिकेत पाठवेल अस वाटत नाही. अनिकेत हा तिच्या पहिल्या पती पासून झालेला मुलगा. माधव शिवाय दुसरा कोणताही असू शकत नाही. ह्याची तो कल्पनाच करू शकत नव्हता. माधव गेल्या नंतर तिने त्याच्याशी लग्न करण्याचा निर्णय घेतला, तेव्हा तो खुप दुखावला होता आणि आता त्याला सोडून आल्यावर तिचा निर्णय कसा चुकीचा होता हे आजही तिला पून: पुन्हा पटवत असतो.

त्यांच्या प्रदर्शनाविषयी रिपोर्ट वर्तमान पत्रात वाचला आणि त्यानंतर त्याच पत्रही वाचलं. परीक्षण लिहिणाऱ्या रंगाची आणि माणसाची चांगला जाण असावी. परीक्षण कर्त्याला मात्र त्यांच्या चित्रातला एकांगीपण जाणवला असावा. दुसऱ्याचे दोष दाखवणे हा तुझा स्वभाव तिला पहिल्याच भेटीत तिच्या लक्षात आला होत. तिच्या कवितेवर तो नेमका बोट ठेऊन म्हणाला होता. दुःख नसतानाही दुःखाची पोझ घेतली तर शब्द खोटं वाटायला लागतात. दुःखाच प्रदर्शन मांडला तरच दुःख आहे अस मानायच असता का? तो मात्र माणसं समजावून न घेता फक्त स्वतःला दुसऱ्यात लादत गेला, आपल्याला दुसऱ्यांने जाणून घ्यावे अपेक्षित कायम राहिला.

तिच्या आयुष्यातले अत्यंत महत्त्वाचे दिवस तिने त्याच्या सोबत कसे काढले ? या गोष्टीचा तिला सुद्धा नवल वाटलं, तेही तीने माधव सोबत आयुष्याचे पंधरा वर्ष सोबत काढल्यावर? तिने कोणत्या आधारावर त्याला स्विकारलं? आणि काही दिवस सहनही केलं. तो केवळ तिचा एक जुना मित्र म्हणून की माधव बरोबर तीच, लग्न होण्याआधी पासून तिच्यावर प्रेम करत होता म्हणून खरं तर तिच्या मनात एक चांगला मित्र आहे. ह्या पलीकडे कसलाही विचार नव्हता. तिने त्याच्याशी लग्न केलं म्हणून त्याचं प्रेमभंग आणि त्यानंतर त्याला आलेले डिप्रेशन त्यातून त्यांनी लिहिलेले पत्र...

या दोघांची पहिली भेट आर्ट गॅलरीतच झाली, "तो तर तसा बुद्धिमान आहे माणूस, तुझ्या प्रेमात फुकट गेला" फक्त बुद्धिमान असलेले लोकच प्रेमात फुकट जातात हे मात्र खर नाही...

त्याने मात्र माधव आणि तिचं पती-पत्नीचं नात स्वीकारलं नाही, त्याला सतत वाटत असे की ती आणि माधव बरोबर आनंदी राहू शकत नाही. असं त्याच मत होतं त्यावेळी. तिला पठवण्याचा खूप वेळा प्रयत्न केला, माधवला सोडून पुन्हा त्याच्याकडे याव यासाठी अर्जवही केला मात्र सर्व गोष्टीकडे दुर्लक्ष केलं या सर्व गोष्टी पाहून तिला वाटलं आयुष्यात पुन्हा त्याचं तोंड सुध्दा पाहणार नाही. पण माधव असा गेल्यावर तीच्या एकटेपणात धाऊन आला. समंजस मित्रसारखा वागू लागला. तीच्या आयुष्यात पुन्हा नव्याने रंग भरण्याच प्रयत्न केला खरा पण तीला पून्हा माधव कोणत्याही पुरुषात भेटणार नाही ह्याची तीला खात्री होती. तीने मित्रमंडळीतच सल्ला मानून अनिकेत आणि स्वता: लाही समजावून स्वीकार केला.

सुरवातीचा आवेग संपल्यानंतर तिला वाटला होत तो माणसात येईल, कलावंत असण आणि माणूस असण ह्यात खुप फरक असतो, हे तीला त्याच्या जवळ राहून कळलं. माधव आणि त्याच्या स्वभावातील वैशिष्ट्य ती इथे मांडते. माधव कलावंत नसला तरी एक उत्तम माणूस आहे. माधव माणसाचं मन समजणारा, त्याच्या तृप्तीन तृप्त होणारा. समोरच दुखावला गेला की स्वतः दुःखी होणारा. ती अशी सुद्धा बोलते की माधव भेटला नसता तरच तीने त्याचं असं स्वभाव स्वीकारला असता. ती त्याला नेहमी कोरडी वाटायची, तिचं कारुण्य, ममता, वात्सल्य अश्या पारंपरिक स्त्री भावना दाखवणाऱ्या चित्राची सवय झाली होती त्याला, आणी तिचाही नाईलाज होता शेवटी.

त्यांच प्रेम मात्र तीच्यावर होत, ग्लासवर ग्लास आपटणाऱ्या सेलिब्रेशन करणाऱ्या अनामिकेच कौतुक तसेच स्वतःच्या हाताने जेवू घालणाऱ्या विद्येच सुध्दा कौतुक अर्थातच वेगवेगळया स्त्रियांचं कौतुक त्याला एकाच स्त्रीमध्ये पाहिजे होत. श्रीरंग सारखे त्याचे मित्र त्याच्या बद्दल बाजू मांडतात. सुद्धा तेव्हा कधी कधी ते पटताटही. पुन्हा त्या अनुभवातून जाण्याची तिची तयारी नाही. पुरुषाशिवाय राहण्यातच ती आनंदी आहे. तिला त्याच्या कले विषयी आणि बुद्धी विषयी असलेली आदर आता काही वर्षांत विरून गेला आहे.

घटस्फोटाचे पेपर त्याच्याकडे सही करण्यासाठी पाठवले आहेत. सही करून पाठवून दे हट्टाने पाठवले नाहीस तरी फारसा काही फरक पडत नाही. तीच्या कवितांचा संग्रह अनिकेत रसघेऊन काडतो आहे. तो प्रकाशनही धडाक्यात करायचं म्हणतोय. तिची अजिबात ईच्छा नाही पण त्यांच्या आनंदावर विरजण नको पडायला. प्रकाशन केला तर पत्रिका पाठवेन आलास तर बरं होईल तिला एक जुना मित्र भेटल्याचा आनंद.

त्यांची चित्राविषयी तीने जे म्हटले त्याची परतफेड म्हणुन वर्तमानपत्रात कवितेला पारंपरिक चौकत मांडणारी कविता म्हटले आहे, ह्यावरून सिध्द होते की स्वभाव किती खडूस वृत्तीचा आहे, हे समजत.

श्रीरंग अलीकडेच तिच्याकडे येऊन गेला . घटस्फोट घेऊ नकोस असा सल्ला दिला. तुझ पिणं वाढल्याचाही सांगितल. घटस्फोटाच्या कागदावर सही करायची वेळ आल्यामुळे तर नाही ना? हॉस्पिटलमध्ये ऍडमिट केल्यावर श्रीरंगचा फोन आला होता.तसेच तीन अनिकेतलासुद्धा सांगितला. त्यानं सामंजसपणे विचारले सुद्धा , पण प्रियसी ने नाही म्हटलं.

तिला कळून सुद्धा ती आली नाही. म्हणून पिण्याची लहर वेगरे आली की काय? अशी पुरुषाची मानसिकता कशी काय होते. बायकांनी असं केल असते, तर हजारो दारूचे गुत्ते उघडावे लागले असते.

ती आली असती तर कदाचित त्यांच्या डोळ्यातील वेदना पाहून तिला ते कागदपत्रं फाडायची इच्छा झाली असती. पण जड अंत करणाने हिने संयम ठेवून सुद्धा ती तिथे बघायला आली नाही. दुःखाच्या डोंगरात मात्र तिला पुन्हा गुंतायच नव्हत.

त्याचं लिव्हर खराब झाल हे तिला श्रीरंगने सांगितल, श्रीरंगच्या म्हण्यांनुसर त्याला आता तिची गरज आहे, पण तिला वाटत त्यापेक्षा व्यसमुक्ती केंद्राची गरज आहे. त्यांची दारू वाढली, कारण ती सोडून गेल्यामुळे नाही.तर तो स्वतः जास्त आत्माकेंद्री बनत गेला म्हणून.

मध्यंतरी श्रीरंग आणि तो व्यसनमुक्ती केंद्रात जाऊन आले. तिचं सल्ला त्यांनी सहज मानला.

अनिकेतही आता  एम.एस साठी न्यूयॉर्कला जायचं म्हणतोय.त्याला मला एकटीला सोडून जायला जीवावर आलंय.पण त्याने मनाची तयारी झाली केली आहे. अनिकेत तुझ्याकडे जाण्याच पर्याय ही सुचवला त्याने, तेव्हा आश्चर्याचा धक्काच बसला. त्याला पंख पसरवताना आईची जबाबदारी कोणावर तरी पसरवण्याची वेळ आली आहे. अस त्याला वाटत. हल्ली मला अनिकेत आणि माधवचा भास व्हायला लागला आहे.हल्लीच्या पिढीला आपल्या आई वडिलांचं गांभिर्य राहिलेच नाही.

अनिकेत आणि तुझ पत्र एकदम तिच्या हाती आली . आठवण येते म्हणतोय. साहजिकच जेवणार्या वेळी पुरुषाला आईची / बायकोची आठवण ही येतेच. अर्थातच विस्मरणात जाईल त्याला कोण जोडीदारिन भेटल्यावर.भेटायचं आहे तिला मात्र अजूनही मन मात्र तयार नाही.कायदेशीररित्या विभक्त होण्यासाठी करावी लागणारी दगदग टाळून असच दूर राहता येईल अस तिला वाटत. तसही जड जाणार नाही.

प्रियसीला भेटून गेल्यावर बर वाटलं . पूर्वीपेक्षा खूप समंजस असल्यासारखा वाटलं. ह्या वेळी तो सोबत असताना मात्र तिला माधव व अनिकेतची आठवण आली नाही. हे ती मुद्दामहून पत्रात नमूद करते, असच कधी वळवाच्या सरीसारख भेटून एकमेकांच्या आयुष्यात गारवा आणला थोडाफार तर थोडा जास्त चांगला नाही का?

**- धनराज  साळवी**

**तृतीय वर्ष कला शाखा**